SONI TILES
Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road,
Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of -
Ceramic Wall & Floor Tiles,
Vitrified Tiles, Paving Blocks,
Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज



नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

चाहूल लागता थंडीची... आठवते दुकान जरीवालाची
। स्वेटर्स । जॅकेट। 2 in 1 जर्किन
। टोपी । ग्लोज । सॉक्स । मफलर
लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी.
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
आता पुण्यात सुद्धा..

जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505
जरीवाला मेन्स, महाजनवाडी, अहिल्यानगर.मो. 9850216268

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. १६.११.२०२६ | अंक नं. १९० | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020




थंडीचे कपडे...
जन्मलेल्या बाळापासून
मोठ्या महिला
व पुरुषांसाठी,
मुला-मुलींसाठी...
स्वेटर्स,जॅकेट, जर्कीन,
टोपी, उलन स्टोल,मफलर,
सॉक्स,स्वग व
अजून बरेच काही
आणि तेही रास्त दरात
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आमरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०१९८८

राज्यातील न्यायालयीन कर्मचारी १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपावर

उच्च न्यायालयाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करावी; २१ महिन्यांपासून वेतनवाढीचा प्रस्ताव शासनदरबारी प्रलंबित

नगर – समान काम, समान वेतन या तत्त्वानुसार उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्रातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपावर जाणार आहेत. महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या आंदोलनात अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारीही सहभागी होणार आहेत.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव उच्च न्यायालयाच्या समितीने मंजूर करून महाराष्ट्र शासनाकडे पाठविला आहे. मात्र, या प्रस्तावाला २१ महिने उलटूनही शासनाकडून अद्याप अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही. ३१ जानेवारी २०२५ पासून या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असूनही शासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेतली नसल्याचा आरोप कर्मचारी महासंघाने केला आहे.

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या वेतनश्रेणीप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करून वेतन मिळावे, अशी न्यायालयीन कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी आहे. यासंदर्भातील प्रस्ताव उच्च न्यायालयाच्या समितीने मान्य करून शासनाकडे पाठविल्यानंतरही त्यावर निर्णय होत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे. समान कामाच्या तत्त्वानुसार वेतनश्रेणीतील तफावत दूर करून न्याय मिळावा, यासाठी महासंघाने आता बेमुदत संपाचे हत्यार उपसले आहे.

दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीसंदर्भात महाराष्ट्र शासनाने अधिकृत शासन निर्णय काढल्याशिवाय बेमुदत संप मागे घेतला जाणार नाही, अशी भूमिका महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाने घेतली आहे. मागणी मान्य होऊन शासन निर्णय जारी होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे. या संपामुळे राज्यातील न्यायालयीन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

याबाबतची माहिती अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अंकुश सांगळे, कार्याध्यक्ष शिरीष ढाळे, सचिव रवींद्र सूर्यपुजारी, उपाध्यक्ष अतुल खरपुडे, राम बेलेकर, प्रशांत साठे आणि अविनाश लिपाने यांनी दिली.

देवघरात दिवा लावताना साडीने पेट घेतल्याने भाजून महिलेचा मृत्यू

नगर – देवघरात देवासमोर दिवा लावताना साडीने पेट घेतल्याने भाजून गंभीर जखमी झालेल्या वृद्ध महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना नगर तालुक्यातील निंबळक येथे १५ नोव्हेंबर रोजी दुपारी घडली. सुमन रामनाथ गवळी (वय ७३, रा. अंबिका निवास, निंबळक, ता.नगर) असे मयत महिलेचे नाव आहे.



सुमन गवळी (मयत)

या प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, मृत महिला सुमन गवळी या देवघरात दिवा लावत असताना त्यांच्या साडीने अचानक पेट घेतला. त्यामुळे त्या गंभीररीत्या भाजल्या. त्यांना भाजलेल्या अवस्थेत १५ नोव्हेंबर सायंकाळी ५.२६ वाजण्याच्या सुमारास साईदीप सह्याद्री हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू असताना, सायंकाळी ७.१६ वाजण्याच्या सुमारास डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

याबाबत डॉक्टरांनी दिलेल्या अहवालावरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत सुमन यांच्या पश्चात १ मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे.

यंदाची सुवर्णखरेदी, भरघोस फायद्याची..
दिवाळी धमाका ऑफर
₹999/- प्रतीग्रॅम मजुरी
(22 कॅरेट सर्व दागिन्यांची)
+
₹111/- चांदी चक्क फ्री
(प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)

सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनव्दारे
11 एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी*
(प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)
ऑफर कालावधी - 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु
Conditions Apply*


भावपूर्ण
आदरांजली
बँकेचे माजी संचालक
श्री. नंदलालजी
मुरलीधरजी मणियार
(स्व. दि. २५-१०-२०२६)
प्रेरणादायी स्मृतीस
भावपूर्ण श्रध्दांजली !
नितीन भंडारी, मुख्य कार्यकारी अधिकारी | हस्तीमल मुनोत, संस्थापक चेअरमन व विद्यमान संचालक | अमित मुथा, व्हा.चेअरमन | संजय चोपडा, चेअरमन
संचालक मंडळ
अनिल पोखरणा, कमलेश भंडारी, आनंदराम मुनोत, संजय बोरा, किशोर गांधी, सीए आयपी अजय मुथा, सीए मोहन बरमेचा, किशोर मुनोत, संजीव गांधी, सुभाष बायड श्रीमती प्रमिलाबाई बोरा, श्रीमती मीनाताई मुनोत, विजय कोर्थिबीरे, सुभाष भांड, जितेंद्र बोरा (कर्मचारी प्रतिनिधी) ❋ प्रसाद गांधी (कर्मचारी प्रतिनिधी)
बोर्ड ऑफ मॅनेजमेंट - सीएआयपी अजय मुथा (चेअरमन), किशोर मुनोत, राजेश झंवर, पेमराज बोथरा, सीए प्रवीण कटारिया
अहमदनगर मर्चन्टस् को-ऑप. बँक लि. (शेड्यूल्ड बँक)
मर्चन्टस् बँक जेथे.. लक्ष्मी वास करी तेथे...
प्रधान कार्यालय : प्लॉट नं. ३३, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहिल्यानगर. फोन : ०२४१ -२३२२२२२



॥ ॐ द्रां दत्तात्रेयाय नमः ॐ ॥ ॥ ॐ नमो भगवते श्री शंकर सद्गुरू राया ॥
॥ मुझे वही जानता है, जो खुदको समझता है ॥
सद्गुरू
श्री शंकर महाराज
प्रकट दिन सोहळा
सद्गुरू कृपांकित भाविक-भक्तांनो
सालाबादप्रमाणे याही वर्षी मंगळवार दि.१७ नोव्हेंबर २०२६ रोजी
सद्गुरू श्री शंकर महाराजांचा प्रकट दिन सोहळा साजरा होणार आहे.
सद्गुरूंच्या दर्शन सोहळ्याचा लाभ घ्यावा
ही मंगल भक्त सेवा मंडळाच्या वतीने नम्र विनंती.
- कार्यक्रमाची रूपरेषा -
सकाळी ९.०० ते १०.३० - श्रीं चा महाभिषेक
सकाळी १०.३० ते १२.०० - श्री शंकरगीता सामुहिक पारायण
दुपारी १२.०० ते १.०० - श्रीं ची महाआरती व श्रींचा पाळणा
दुपारी १.०० ते २.०० - श्रीं चा पालखी सोहळा तद्नंतर महाप्रसाद, दर्शन सोहळा व भजन
सायं ५.०० ते ७.०० - सालासर सत्संग मंडळ, हनुमान मंदिर झेंडीगेट यांचे सुंदर कांड
- आपले विनित -
मंगल भक्त सेवा मंडळ (ट्रस्ट)
श्री विश्वेश्वर स्वामी महाराज
मंगल दत्त क्षेत्र, एफ-७०, एम.आय.डी.सी., अहिल्यानगर
टिप : कृपया पुष्पगुच्छ आणु नये त्यापेक्षा अन्नदान व वैयक्तीय सेवेत सहभाग नोंदवावा !


जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन - २४१४१४१, २४१९९९९, मो. ९२०९६६६६६६

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

उसाला चार हजारांचा भाव मिळाल्याशिवाय आता माघार घेणार नाही; २३ नोव्हेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा एल्गार मोर्चा

नगर - शेतकऱ्यांनी रक्ताचे पाणी करून ऊस पिकवायचा, त्यासाठी लाखो रुपये खर्च करायचे आणि आपल्या घामाचा योग्य मोबदला मागताना साखर कारखानदारांच्या दारात उभे राहायचे, ही व्यवस्था आता खपवून घेतली जाणार नाही. साखरेचे दर प्रतिकिलो ५४ रुपयांपर्यंत पोहोचले असताना ऊस उत्पादकांना मात्र योग्य दर देण्यास कारखानदार तयार नाहीत. शेतकऱ्यांच्या कष्टाची लूट सुरू असताना सरकार आणि लोकप्रतिनिधीही मूग गिळून बसले आहेत. त्यामुळे आता भगतसिंग-राजगुरूंसारखा संघर्षाचा मार्ग स्वीकारून साखरसम्राटांविरोधात लढावे लागेल, असा आक्रमक इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. उसाला प्रतिटन चार हजार रुपये दर मिळावा, या मागणीसाठी येत्या २३ नोव्हेंबर रोजी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या उपस्थितीत अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार असून, जिल्हाधिकाऱ्यांना घेराव घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मागण्या मान्य झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही, असा निर्धार संघटनेने व्यक्त केला.



ऊसदराच्या प्रश्नावर संघटनेची भूमिका स्पष्ट करण्यासाठी पदाधिकारी शासकीय विश्रामगृहात आले होते. मात्र, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आंदोलनाची माहिती देण्यासाठी आलेल्या पदाधिकाऱ्यांना साधे सभागृह अथवा बैठक घेण्यासाठी खोलीही उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्यामुळे संतप्त पदाधिकाऱ्यांनी जमिनीवर बसून पत्रकारांशी संवाद साधला. (छायाचित्र : लहू दळवी)

ऊसदराच्या प्रश्नावर संघटनेची भूमिका स्पष्ट करण्यासाठी पदाधिकारी शासकीय विश्रामगृहात आले होते. मात्र, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आंदोलनाची माहिती देण्यासाठी आलेल्या पदाधिकाऱ्यांना साधे सभागृह अथवा बैठक घेण्यासाठी खोलीही उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्यामुळे संतप्त पदाधिकाऱ्यांनी जमिनीवर बसून पत्रकारांशी संवाद साधला. लाखाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्याला अहिल्यानगरसारख्या ठिकाणी जनतेच्या पैशातून बांधलेल्या शासकीय विश्रामगृहात साधी खोली मिळत नसेल, तर यापेक्षा दुर्दैव काय? आम्ही जमिनीवर बसून आंदोलनाची माहिती देत आहोत. प्रशासनाने शेतकऱ्यांची एकप्रकारे चेष्टा केली आहे, असा आरोप रवींद्र मोरे यांनी केला. शेतकऱ्यांच्या कष्टावर उभी असलेली व्यवस्था त्याच शेतकऱ्याला सन्मानाने वागणूक देत नसेल, तर ही परिस्थिती बदलण्यासाठी संघर्ष करावाच लागेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रतिटन ३१४९ रुपये दर मान्य नाही

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी त्यांच्या साखर कारखान्याचा प्रतिटन ३१४९ रुपये दर जाहीर केला आहे. मात्र, आम्हाला हा दर मान्य नाही आणि तो स्वीकारण्याचाही प्रश्न नाही. शेतकऱ्यांच्या घामाची किंमत चार हजार रुपये प्रतिटन असली पाहिजे. केवळ दर जाहीर करून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रयत्न करू नये. ज्या कारखान्यांनी कमी दर जाहीर केला आहे, त्यांनी शेतकऱ्यांना उर्वरित फरकही द्यावा लागेल. चार हजार रुपये प्रतिटन या मागणीवर संघटना ठाम आहे, असे मोरे यांनी स्पष्ट केले.

सहकारी कारखानेच तोट्यात का जातात?

खासगी साखर कारखाने चांगल्या पद्धतीने चालतात, मग सरकारी आणि सहकारी कारखानेच तोट्यात का जातात? कारखाने तोट्यात असल्याचे सांगून शेतकऱ्यांचा दर कमी ठेवण्याचे कारण काय? कारखानदारांनी त्यांच्या आर्थिक व्यवहारांचा हिशेब शेतकऱ्यांसमोर मांडावा. कारखान्यांना होणारा तोटा नेमका कशामुळे होतो, याची तपासणी झाली पाहिजे. कारखान्यांच्या उत्पन्नातील योग्य वाटा शेतकऱ्यांना मिळालाच पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली.

पालकमंत्र्यांच्या बैठकीला कारखानदारांच्या अध्यक्षांची दांडी

ऊसदराच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी साखर कारखान्यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि प्रशासनाची बैठक बोलावली होती. मात्र, या बैठकीला एकाही कारखान्याचा अध्यक्ष उपस्थित राहिला नाही. शेतकऱ्यांच्या इतक्या गंभीर प्रश्नावर पालकमंत्र्यांनी बैठक बोलावूनही कारखानदारांचे अध्यक्ष फिरकले नाहीत, यासारखे दुर्दैव दुसरे कोणते? प्रत्येक कारखान्याने आपापल्या पातळीवर दर जाहीर करून मोकळे होण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या मागण्यांवर एकत्रित चर्चा करून निर्णय घेणे अपेक्षित होते. मात्र, कारखानदारांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांशी काही देणेघेणे नसल्याचे त्यांच्या वागणुकीतून दिसत आहे.

शेतकऱ्यांचे तीनशे कोटी लुटले

जिल्ह्यातील १७ साखर कारखान्यांनी चालू गळीत हंगामात शेतकऱ्यांचे सुमारे ३०० कोटी रुपये लुटल्याचा गंभीर आरोप सुरेश टाके यांनी केला. या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशाचा हिशेब कारखानदारांनी दिलाच पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या घामाला किंमत नसेल, तर संघर्षाशिवाय पर्याय नाही. भगतसिंग-राजगुरूंसारखा आता आम्हालाही अन्यायाविरोधात लढा उभारावा लागेल, असा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला. चार हजार रुपये प्रतिटन दर मिळाल्याशिवाय आणि शेतकऱ्यांच्या मागण्यांवर ठोस निर्णय झाल्याशिवाय आंदोलन मागे घेतले जाणार नाही. आता शेतकरी गप्प बसणार नाहीत, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. पत्रकार परिषदेला रवींद्र मोरे, अभिजित पोटे पाटील, सुरेश टाके पाटील यांच्यासह संघटनेचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

युवकाची गळफास घेत आत्महत्या

नगर - पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथे एका २२ वर्षीय युवकाने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ०९:४५ वाजण्याच्या पूर्वी घडली. या घटनेत मृत पावलेल्या तरुणाचे नाव सुनील रामभाऊ पवार (वय २२ वर्ष, रा. ढवळपुरी, ता. पारनेर) असे आहे.

सुनील पवार याने गळफास घेतल्याचे निदर्शनास येताच त्यास त्यांचे नातेवाईक यांनी औषधोपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, पारनेर नेले. मात्र, रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना तपासून ते उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले. यासंदर्भातील दवाखान्याचा मेमो पारनेर पोलीस ठाण्याला प्राप्त झाल्यानंतर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू ची नोंद करण्यात आली आहे.

तरुणाची गळफास घेत आत्महत्या

नगर - राहत्या घरात फॅनला सुती दोरीच्या सहाय्याने गळफास घेत तरुणाने आत्महत्या केल्याची घटना श्रीगोंदा तालुक्यातील थिटे सांगवी येथे १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास निदर्शनास आली. सचिन मच्छिंद्र देवकाते (वय ३५ वर्षे, रा.देवकाते वस्ती, थिटे सांगवी, ता. श्रीगोंदा) असे मयताचे नाव आहे.

सचिन देवकाते यांनी राहत्या घरात फॅनला सुती दोरीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे निदर्शनास येताच त्यांना त्यांच्या नातेवाईकांनी उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, श्रीगोंदा येथे नेले, येथील डॉक्टरांनी त्यांना तपासून उपचारापूर्वीच मयत घोषित केले आहे. या घटनेची खबर रावसाहेब नाथा देवकाते (वय ६२ वर्ष, धंदा शेती, रा. देवकाते वस्ती, थिटे सांगवी, ता. श्रीगोंदा) यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात दिली. या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यू ची नोंद करण्यात आली आहे.

गळफास घेत एकाची आत्महत्या

नगर- शहरातील वाघ गल्ली मधील ५१ वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना १५ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी घडली आहे. सुखदेव बबन गोरे (वय ५१ वर्षे, मूळ रा. देऊळगाव गलांडे, ता. श्रीगोंदा, हल्ली रा. वाघ गल्ली, साईबाबा मंदिरजवळ, अहिल्यानगर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

सुखदेव गोरे यांनी १५ नोव्हेंबर सकाळी ११. १५ वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी भेट दिल्यानंतर त्यांचा मुलगा आकाश सुखदेव गोरे यांनी त्यांना उपचारासाठी खाजगी ॲम्ब्युलन्समधून सिव्हिल हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे दाखल केले. परंतु, तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. संग्राम काळे यांनी त्यांची तपासणी करून उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबतच्या अहवालावरून कोतवाली पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मोटरसायकलची चोरी

नगर - रेल्वे स्टेशनच्या गेट समोरील मोकळ्या जागेत उभी केलेली हिरो कंपनीची एचएफ डिलक्स मोटरसायकल (क्र. एमएच १६ सीएस २०८५) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १२ नोव्हेंबर रोजी रात्री ८.५० वाजेपासून ते १३ नोव्हेंबर रोजी पहाटे २ वाजेच्या दरम्यान घडली आहे. याबाबत बाळासाहेब अप्पाजी पिंपळे (वय ५५, रा. वडगाव तांदळी, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०५ (ब) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आठवड्याच्या पहिल्याच दिवशीसोन्याच्या दरात घसरण

नगर - सोन्याच्या दरात घसरण होण्याचे सत्र सुरूच असून आठवड्याच्या पहिल्याच म्हणजेच १६ नोव्हेंबर रोजी सोन्याच्या किमतीत पुन्हा घसरण पहायला मिळाली. त्यामुळे सोने खरेदी करण्याचा विचार करणाऱ्या ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. राजधानी दिल्लीमध्ये २४ कॅरेट सोन्याचा दर १ लाख ३७ हजार ७६० रूपये प्रति १० ग्रॅम झाला आहे. मुंबईमध्ये हाच दर १ लाख ३७ हजार ६१० रूपये प्रति १० ग्रॅम झाला आहे. तर अहिल्यानगर शहरातही याच सरासरीने सोन्याचा भाव राहिला आहे.

गेल्या आठवड्यातही सोन्याच्या दरात मोठी घसरण झाली होती. या काळात २४ कॅरेट सोन्याचे दर प्रति १० ग्रॅममागे तब्बल ५९५० रूपयांनी कमी झाले. तर २२ कॅरेट सोन्याच्या दरात ५४५० रूपयांची घट झाली.

आंतरराष्ट्रीय बाजारातही सोन्याच्या किमतीत मोठी घसरण झाली आहे. सध्या आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचा भाव ३८९२. ४२ डॉलर प्रति औस आहे. गेल्या आठवड्यात जागतिक बाजारात सोन्याच्या किमतीत तब्बल ४.५ टक्क्यांची घसरण झाली आहे.

मात्र, सध्या सोन्याचे दर कमी होत चालले असले तरी भविष्यात त्यामध्ये मोठी वाढ होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. इंडिया बुलियन ॲण्ड ज्वेलर्स असोसिएशनचे सचिव सुरेंद्र मेहता यांच्या अंदाजानुसार, २०२७ च्या अखेरपर्यंत आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचा भाव ६२०० डॉलर प्रति औंसपर्यंत पोहोचू शकतो. तसेच चांदीचा भाव १८० डॉलर प्रति औंसपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

चांदीच्या दरातही मोठी घसरण

सोन्यापाठोपाठ चांदीच्या दरातही मोठी घसरण सुरूच आहे. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी चांदीचा भाव १ लाख ९४ हजार ९०० रूपये प्रति किलोवर आला आहे. गेल्या आठवड्यात चांदीच्या दरात तब्बल १० हजार रूपयांची घट झाली. विशेष म्हणजे, याच वर्षी जानेवारी महिन्यात देशात चांदीच्या किमतीने ४ लाख रूपये प्रति किलोचा विक्रमी टप्पा गाठला होता. मात्र, त्यानंतर चांदीच्या दरात मोठी घसरण झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात सध्या स्पॉट सिलव्हरचा भाव ४८.८० डॉलर प्रति औंस आहे. एकीकडे सोने आणि चांदीच्या दरात सातत्याने घसरण होत असल्याने ग्राहकांना दिलासा मिळत आहे. मात्र, आगामी काळात या दोन्ही मौल्यवान धातूंच्या किंमती पुन्हा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

आसाराम पालवे यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर - वरवंडे गल्ली, माळीवाडा येथील रहिवासी आसाराम उर्फ मायकल पालवे (वय ४०) यांचे १५ नोव्हेंबर रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १६ नोव्हेंबर रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, पत्नी, २ मुले, चुलत भाऊ, बहीण असा परिवार आहे.

भाऊ खेडकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी भाऊ काशिनाथ खेडकर (वय ७०) यांचे १४ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बबन व हनुमंत खेडकर यांचे ते वडील होत.

श्रीमती चंदाबाई पांडे यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील श्रीमती चंदाबाई देवीलाल पांडे (वय ७५) यांचे १४ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, दिर, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. महावीर नाष्टा सेंटरचे मालक राजेंद्र पांडे व गणेश पांडे यांच्या मातोश्री, विकास पांडे यांच्या आजी होत.

सुनिताबाई मुठे यांचे दुःखद निधन



श्रीरामपूर - येथील सुनिता अशोकराव मुठे (वय ७२) यांचे दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात एक मुलगा, दिर, सून, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. शेतकरी व केमिस्ट अविनाश मुठे यांच्या मातोश्री, माणिकराव गोविंदराव मुठे यांच्या भावजयी, ह.भ.प.रविंद्र महाराज मुठे, दत्तात्रय, राहुल व सागर मुठे यांच्या चुलती होत.

डॉ.नारायण चौधरी यांचे दुःखद निधन



श्रीरामपूर - येथील एम.डी. (मेडीसीन) कन्सल्टंट फिजिशियन हृदयरोगतज्ञ डॉ.नारायण गणपत चौधरी (वय ८०) यांचे १४ नोव्हेंबर रोजी दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. प्रफुल्ल चौधरी यांचे वडील होत.

विषारी औषध सेवन केलेल्या 'त्या' शेतकऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू

नगर - विषारी औषध सेवन केलेल्या शेतकऱ्याचा नगर शहरातील खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ५.२९ वाजण्याच्या सुमारास दुर्दैवी मृत्यू झाला. नवनाथ दत्तू चव्हाण (वय ४५ वर्षे, रा. हरीचातांडा, ता. पाथर्डी) असे मयत शेतकऱ्याचे नाव आहे.

या प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, नवनाथ दत्तू चव्हाण यांनी कोणत्या तरी अज्ञात कारणावरून त्यांच्या राहत्या घरी १३ नोव्हेंबर रोजी विषारी औषध सेवन केले होते. त्यानंतर त्यांचे नातेवाईक गोरक्ष नवनाथ पवार यांनी त्यांना दुपारी ३.५८ वाजण्याच्या सुमारास अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असताना १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ५. २९ वाजता त्यांचा मृत्यू झाला. याबाबतच्या अहवालावरून पाथर्डी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून त्यांनी विषारी औषध का घेतले याचा तपास पाथर्डी पोलीस ठाण्याचे पोहेकॉ सुहास गायकवाड करत आहेत.

नगर - दौंड रोडवर अपघात; दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

नगर - अहिल्यानगर ते दौंड रोडवर श्रीगोंदा तालुक्यातील निमगाव खलू गावच्या शिवारामध्ये भरधाव वेगातील मालवाहू ट्रकने दुचाकीला दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.१५ वाजण्याच्या सुमारास घडली. सोमनाथ नामदेव घाडगे (वय २६, रा. महाडूळवाडी, ता. श्रीगोंदा) असे मयत तरुणाचे नाव आहे.

याबाबत दत्तात्रय दिनकर घाडगे (वय ४०, रा. महाडूळवाडी, ता. श्रीगोंदा) यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीचे चुलत भाऊ मयत सोमनाथ घाडगे हे त्यांच्या ताब्यातील मोटरसायकलवरून (क्र. एमएच ४७ ई १०१३) जात असताना, समोरून येणाऱ्या मालवाहू ट्रॅकच्या (क्र. एमएच ४२ टी २६१९) चालकाने आपले वाहन हलगर्जीपणे, व भरधाव वेगात चालवून फिर्यादीच्या चुलत भावाच्या मोटरसायकलला समोरून जोरदार धडक दिल्याने ते खाली पडले व त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागून त्यांचा जागीच मृत्यू झाला. तसेच या अपघातात त्यांची मोटरसायकल देखील मोठ्या प्रमाणावर नुकसानग्रस्त झाली आहे. या प्रकरणी दत्तात्रय घाडगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ट्रॅकचा चालक सुभाष भानुदास काळे (रा. खडकी, जि. पुणे) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब), ३२४(४) सह मोटर वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मोटरसायकलची चोरी

नगर - नगर तालुक्यातील मांजरसुंबा येथे घरासमोरील शेड मध्ये लावलेली बजाज कंपनीची पल्सर २२० मोटरसायकल (क्र. एमएच १६ टीसी ०६१६) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ७ नोव्हेंबर रोजी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

याबाबत सागर सूर्यभान कदम (वय ३८, रा. मांजरसुंबा, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०५ (ब) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अहिल्यानगर - कल्याण महामार्गावर भीषण अपघात; दुचाकीस्वार जागीच ठार

नगर - नगर - कल्याण महामार्गावर पारनेर तालुक्यातील ढोकी गावचे शिवार, तिखोल फाट्या जवळ भरधाव वेगातील कारने दुचाकीला समोरून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. मयूर शिवाजी गाडेकर (वय ४१ वर्षे, रा. गुरेवाडी, ता. पारनेर) असे मयताचे नाव आहे.

याबाबत मयताची पत्नी स्नेहा मयूर गाडेकर (वय ३७ वर्षे, रा. गुरेवाडी, ता. पारनेर) यांनी पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीचे पती मयत मयूर हे १२ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या ताब्यातील यामाहा कंपनीची मोटरसायकल (क्र. एमएच १६ डीके १६७९) घेऊन अहिल्यानगरकडे रोडच्या डाव्या बाजूने जात असताना, नगर बाजूकडून कल्याण बाजूकडे निघालेल्या महिंद्रा कंपनीच्या एक्सयूव्ही ३ एक्सओ चारचाकी गाडीच्या (क्र. एमएच ४३ सीएम ३१२६) चालकाने आपले वाहन भरधाव वेगात व रॉंग साईडने चालवून फिर्यादीच्या पतीच्या गाडीला समोरून जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत मयूर गाडेकर यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला असून त्यांची मोटरसायकल देखील नुकसानग्रस्त झाली आहे. या प्रकरणी स्नेहा गाडेकर यांनी १५ नोव्हेंबर रोजी पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून चारचाकी गाडीचा चालक शुभम भाऊसाहेब खिलारी (रा. टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब), ३२४(४) सह मोटर वाहन कायदा कलम १८४, १३४(अ)(ब), ११७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अहिल्यानगर - पुणे महामार्गावर अपघातात वाहनचालकाचा मृत्यू

नगर - नगर -पुणे महामार्गावर सुपा येथील हॉटेल आस्वाद ते हॉटेल संग्राम दरम्यानच्या दोन वाहनांच्या झालेल्या भीषण अपघातात एका वाहनचालकाचा मृत्यू झाल्याची घटना १५ नोव्हेंबर रोजी रात्री ८.३० वाजण्याच्या पूर्वी घडली. मिठू नमीमी यादव (वय ४९ वर्ष, रा. जबलपूर, मध्य प्रदेश) असे मयताचे नाव आहे.

या प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, वाहन चालक मिठू यादव यांना नगर-पुणे महामार्गावर सुपा येथे रस्ते अपघातात गंभीर मार लागल्यामुळे खासगी ॲम्ब्युलन्सचे चालक अल्ताफ शेख यांनी त्यांना उपचारासाठी रात्री ८.३० वाजण्याच्या सुमारास सिव्हिल हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे दाखल केले होते. परंतु, हॉस्पिटलमध्ये पोहोचण्यापूर्वी ते मयत झाले असल्याचे स्पष्ट झाले. सिव्हिल हॉस्पिटलचे मेडिकल ऑफिसर डॉ. तांबोळी यांच्या अहवालावरून सुपा पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

भरधाव कारच्या धडकेत सायकलवरील २ बालकांचा दुर्दैवी मृत्यू

नगर - सायकलवरून आनंदाने निघालेल्या दोन चिमुकल्यांचा प्रवास काळाने अर्ध्यावरच संपवला. कर्जत तालुक्यातील निंबोडी फाटा येथे भरधाव इर्टिगा कारने सायकलला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने दोन बालकांचा जागीच मृत्यू झाला. चैतन्य छगन उदमले (वय ८) आणि ओंकार बापू उदमले (वय १०) अशी मृत बालकांची नावे आहेत. १४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी घडलेल्या या भीषण अपघाताने निंबोडी आणि शितपूरसह संपूर्ण कर्जत तालुका सुन्न झाला आहे.



चैतन्य आणि ओंकार हे दोघे १४ नोव्हेंबर रोजी दुपारी सायकलवरून शितपूर फाट्याकडून निंबोडी फाट्याच्या दिशेने जात होते. याचवेळी श्रीगोंद्याकडून जामखेडच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव इर्टिगा कारने (एमएच ०४ जेबी २२०४) दशरथ बापू फुले यांच्या घरासमोर त्यांच्या सायकलला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की, कारच्या पुढील भागाचं मोठं नुकसान झालं, तर सायकलचा अक्षरशः चक्काचूर झाला. अपघातात दोन्ही बालके गंभीर जखमी झाली. घटनेची माहिती समजताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतीचा प्रयत्न केला, पण दोघांचाही जीव वाचू शकला नाही.

दोन्ही बालकांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी मिरजगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी सुजितकुमार क्षीरसागर आणि मिरजगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय झंजाड यांनी घटनास्थळी भेट दिली. भाजप नेते अशोक खेडकर यांनीही घटनास्थळी धाव घेत संतप्त ग्रामस्थांशी संवाद साधला.

या प्रकरणी चैतन्यचे वडील छगन मारुती उदमले यांच्या फिर्यादीवरून कार चालक संदीप दामोदर उदमले (रा. ठाणे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय झंजाड करीत आहेत. खेळण्या-बागडण्याच्या वयात दोन बालकांचा असा दुर्दैवी अंत झाल्यानं उदमले कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दोन चिमुकल्यांच्या मृत्यूची बातमी समजताच निंबोडी आणि शितपूर परिसरात शोककळा पसरली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

गृहिणी

आरोग्य

नेत्ररोग व आरोग्य

मोतीबिंदू आणि काचबिंदू हे डोळ्यांचे दोन वेगवेगळे आजार आहेत पण लोक अनेकदा यात गोंधळ करतात. मोतीबिंदूमध्ये डोळ्याच्या आत असलेली नैसर्गिक भिंग हळूहळू पांढरी आणि अपारदर्शक होत जाते त्यामुळे दिसणे धूसर होते जसे धुक्यातून पाहावे तसे वाटते जास्त प्रकाशात त्रास होतो आणि रात्री दिसणे कमी होते हा आजार मुख्यतः वय वाढल्यावर येतो पण मधुमेह मार लागणे किंवा खूप काळ उन्हात काम करणे यामुळेही लवकर येऊ शकतो तर काचबिंदू हा त्यापेक्षा अधिक धोकादायक आजार आहे यामध्ये डोळ्याच्या आतल्या पाण्याचा दाब वाढतो आणि तो दाब डोळ्याच्या मागील नसेवर पडतो त्यामुळे न दिसता हळूहळू नजर कमी होत जाते आधी बाजूचे दिसणे बंद होते आणि नंतर मध्य भागाचेही दिसणे जाते यात डोळे दुखणे डोके दुखणे डोळे लाल होणे उलटीसारखे वाटणे अशी लक्षणे दिसू शकतात पण अनेकदा कोणतीही लक्षणे न दिसताच नजर जाते. यावर उपाय म्हणून चाळीशी नंतर दर सहा महिन्यांनी डोळ्यांची तपासणी करून घेणे अतिशय गरजेचे आहे मोतीबिंदू झाला असेल तर घाबरून जाण्याचे कारण नाही आजकाल छोट्या शस्त्रक्रियेने पांढरी झालेली भिंग काढून त्या जागी कृत्रिम भिंग बसवले जाते आणि दृष्टी पुन्हा स्वच्छ होते पण काचबिंदू मध्ये शस्त्रक्रिया उपयोगी नसते त्यासाठी रोज वेळेवर डोळ्यात थेंब टाकणे दाब नियंत्रणात ठेवणे आणि डोळ्यांच्या तज्ञांचा सल्ला सतत घेणे गरजेचे असते रोज भरपूर पाणी पिणे हिरव्या पालेभाज्या खाणे डोळे चोळणे टाळणे उन्हात जाताना टोपी घालणे आणि वाचन करताना योग्य प्रकाश ठेवणे यामुळे या दोन्ही आजारांपासून बचाव होण्यास मदत होते.

पाककला

भेंडी मसाला

साहित्य : कोवळी भेंडी १/२ किलो, मध्यम बारीक चिरलेला कांदा २, बारीक चिरलेला टोमॅटो २, आलं-लसूण पेस्ट १ चमचा, २ चमचे तेल, १ चमचा जिरे, १/२ चमचा हळद, १ चमचा लाल तिखट, १ चमचा धणे पावडर, १/२ चमचा गरम मसाला, १/४ चमचा आमचूर पावडर, चवीनुसार मीठ, बारीक चिरलेली कोथिंबीर २ चमचे

कृती : भेंडी स्वच्छ धुवून कोरडी करून घ्या. तिचे १ इंचाचे तुकडे करा. कढईत तेल गरम करून त्यात भेंडी घाला. मध्यम आचेवर ५-६ मिनिटे परतून काढून बाजूला ठेवा. त्याच कढईत थोडे तेल घालून जिरे टाका. जिरे तडतडले की चिरलेला कांदा घालून गुलाबी रंग येईपर्यंत परता. त्यात आलं-लसूण पेस्ट घालून एक मिनिट परता. नंतर चिरलेला टोमॅटो, हळद, लाल तिखट, धणे पावडर घालून मिश्रण एकजीव करा. टोमॅटो मऊ होईपर्यंत शिजवा. त्यात परतलेली भेंडी, मीठ, गरम मसाला आणि आमचूर पावडर घालून हलक्या हाताने मिक्स करा. ३-४ मिनिटे झाकण ठेवून वाफेवर शिजवा. तयार भेंडी मसाल्यावर कोथिंबीर घालून गरम पोळी किंवा भाताबरोबर सर्व्ह करा.

वास्तू

घरातील शांततेसाठी

* झोपताना डोके दक्षिणेला किंवा पूर्वेला ठेवावे. पलंगासमोर आरसा असेल तर नकारात्मक स्वप्ने पडतात म्हणून आरसा कपाटाच्या आत लावावा.
* उत्तर दिशा ही कुबेराची दिशा आहे त्यामुळे पैसा वाढतो.
* घरात पिण्याचे पाणी, माठ किंवा पाण्याची टाकी नेहमी ईशान्य कोपऱ्यात ठेवावी. या ठिकाणी पाणी ठेवल्याने घरात शांतता राहते. घरात काटेरी झाडे जसे की निवडुंग अजिबात लावू नये, यामुळे घरात कलह वाढतात.

सौंदर्य

* हळद आणि दही एकत्र करून लावल्यास काळे डाग कमी होतात.
* ओठ फुटत असतील तर रात्री तुपाचा हलका थर लावून झोपा.
* बेसन, हळद आणि दूध याचा लेप आठवड्यातून दोनदा लावावा.

चेहऱ्यावर बर्फाचा तुकडा फिरवल्याने छिद्रे बंद होतात.

सल्ला

* हाताला मिरची लागल्यास हात दह्याने धुवावेत. * उरलेल्या भातापासून लगेच पराठा बनवा

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६

दुर्गाष्टमी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, धनिष्ठा २८।३५, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.

राशिभविष्य

मेष : आज धनलाभ होण्याची शक्यता आहे.

वृषभ : जुन्या मित्राची भेट होईल. अडकलेले काम पूर्ण होईल.

मिथुन : मानसन्मान वाढेल. नातेवाईकांकडून आनंदाची बातमी मिळेल.

कर्क : खर्च वाढण्याची शक्यता आहे. प्रवासात अडथळा येईल.

सिंह : मोठ्या व्यक्तीची ओळख होईल. व्यवसायात फायदा होईल.

कन्या : मन चिंतेत राहील. जवळच्या व्यक्तीशी मतभेद होतील.

तूळ : नवीन काम सुरू होईल. कुटुंबात वाद वाढेल.

वृश्चिक : आरोग्यात बिघाड होण्याची शक्यता आहे.

धनु : अचानक पैसे मिळतील. नोकरीत बदल होईल.

मकर : शत्रूवर विजय मिळेल. मालमत्तेचा लाभ होईल.

कुंभ : दिवस आनंदात जाईल. संततीकडून सुवार्ता मिळेल.


मीन : कामाचा व्याप वाढेल. प्रवास घडण्याची शक्यता आहे.

शब्दगंध क्र. ७५५६ सौ.शैलजा कुलकर्णी

आडवे शब्द :- १) पुरुषाचे एक आदरार्थी टोपणनाव ५) दुसऱ्याच्या मनातले ओळखणारा ८) पडदा; कापडी भिंत १०) आस्था; आपुलकी ११) भरभर (झाडावर वगैरे चढणे) १२) संपूर्ण वर्षभर १५) विभाजन करणारा १८) कडा; सुळका १९) जंगलाचा राजा; सिंह; केसरी २०) दृष्टी

उभे शब्द :- १) न पिकणारी (जमीन) २) सुवर्ण; कांचन; कनक; सोने ३) बागकाम करणारा; फुलधर; माळी; बागवान ४) कमी वेळेत; जलदी ६) मंदिर वगैरेचा सर्वोच्च भाग ७) तूर, हरभरा वगैरे धान्याचे दोन भाग ९) सुंदर; छान; बरवा ११) स्वाक्षरी; सिग्नेचर १२) व्यंजनापासून बारा स्वरांच्या मिलाफाने तयार होणारी अक्षरांची मालिका कमळ १३) एकमेकांचा होणारा आदरसत्कार (लग्नात वगैरे) १४) एक फूल; राजीव; नीरज; कमळ १५) पोकळी; छिद्र १६) अंत:करणाची जागृत स्थिती; चैतन्य १७) थोडासा; अल्पसा

शब्दगंध क्र. ७५५५ चे उत्तर



* * * * * * * मुलांचे विश्व * * * * * * *

सुविचार : सुख विकत घेता येत नाही आणि दुःख टाळता येत नाही, हेच खरे जीवन आहे.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

डोळे मिटल्यावर स्वप्ने कशी पडतात?

डोळे मिटल्यावर स्वप्ने पडणे, ही काही कल्पनेची गोष्ट नसून, आपल्या मेंदूने आणि मनाने मिळून केलेली एक गुंतागुंतीची आणि सुंदर अशी रचना आहे. आपण जेव्हा झोपायला जातो, तेव्हा झोप एका सरळ रेषेत येत नाही, तर ती चढउतार असलेल्या लाटांसारखी येते. सुरुवातीला आपली झोप हलकी असते, या वेळी आजूबाजूचे आवाज थोडेफार जाणवतात. नंतर आपण हळूहळू गाढ आणि शांत झोपेत जातो. या शांत झोपेत आपले संपूर्ण शरीर विश्रांतीच्या अवस्थेत जाते, श्वासाची गती कमी होते, हृदयाचे ठोके मंद होतात, रक्तदाब थोडा खाली येतो, आणि स्नायू पूर्णपणे सैल होतात. या वेळी मेंदू शरीराच्या दुरुस्तीचे काम करतो,

दिवसभरात झीज झालेल्या पेशी भरून काढतो, आणि दुसऱ्या दिवसासाठी ऊर्जा साठवतो. पण या गाढ झोपेनंतर, सुमारे नव्वद मिनिटांनी, एक वेगळीच अवस्था सुरु होते, जिला स्वप्नावस्था असे म्हणतात. या अवस्थेत चमत्कार घडतो, बाहेरून माणूस अगदी शांत झोपलेला दिसतो, त्याचे हातपाय हलत नाहीत, पण आतमध्ये त्याचे डोळे पापण्यांखाली वेगाने गोल गोल फिरत असतात, आणि मेंदूतील लहरी जागेपणी जशा असतात, तशाच वेगाने धावू लागतात. म्हणजेच, शरीर झोपलेले असते, पण मेंदू जागा झालेला असतो. याच वेळी स्वप्ने पडायला सुरुवात होते. मग प्रश्न येतो की, ही स्वप्ने येतात तरी कुठून. तर, आपला मेंदू हा एक अफाट स्मृतींचा सागर आहे. आपण लहानपणापासून आजपर्यंत जे काही पाहिले, अनुभवले, ऐकले, वाचले, आणि मनातल्या मनात विचार केले, ते सर्वच्या सर्व मेंदूच्या खोल कप्प्यात साठलेले असते. त्यातील काही गोष्टी आपल्याला आठवतात, तर काही आपण विसरून गेलो असे वाटते, पण त्या पुसल्या जात नाहीत.

स्वप्नावस्थेत मेंदू या साठवलेल्या सागराला ढवळून काढतो, तो दिवसभराच्या ताज्या आठवणी, जुनी दुःखे, मनात दाबलेली भीती, अपूर्ण राहिलेल्या इच्छा, आणि अतोनात आनंदाचे क्षण, या सर्वांना एकत्र आणतो, आणि त्यांना तोडून जोडून एक नवीच कथा तयार करतो. म्हणूनच, कधी कधी स्वप्नात आपण उडत असतो, कधी नदीत पोहत असतो, कधी मरण पावलेल्या व्यक्तीशी गप्पा मारत असतो, तर कधी परीक्षेच्या खोलीत बसलो आहोत असे वाटते, कारण ती प्रत्यक्ष घटना नसून, अनेक भावनांचे आणि आठवणींचे एकत्रित चित्र असते.

या स्वप्नांचा आपल्या जीवनात खूप मोठा उपयोग आहे. पहिला उपयोग म्हणजे, भावनांची मोकळीक, जी गोष्ट आपण जागेपणी कोणाला सांगू शकत नाही, किंवा जी भीती आपण मनातच ठेवतो, ती स्वप्नातून बाहेर पडते, आणि मन हलके होते. दुसरा उपयोग म्हणजे, शिकण्याची पक्की होणे, दिवसा आपण जे नवीन शिकतो, ते मेंदू रात्री स्वप्नांच्या वेळी गिरवून पक्के करतो. आणि तिसरा उपयोग म्हणजे, येणाऱ्या धोक्याची तयारी, अनेकदा मेंदू स्वप्नातून आपल्याला कठीण परिस्थितीचा सराव करवतो, त्यामुळे प्रत्यक्षात तशी वेळ आली, तर आपण अधिक सजग राहतो. म्हणून, स्वप्ने पडणे ही मेंदूची उजळणी, मनाची धुलाई, आणि उद्यासाठीची तयारी आहे.

आळसाचे फळ

कोतुळ गावाच्या कडेला असणाऱ्या मळ्यात, रघू नावाचा एक शेतकरी राहत होता. त्याच्याकडे वडिलोपार्जित तीन एकर बागायती जमीन होती. जमीन काळी कसदार होती, विहिरीला बारमाही पाणी होते, आणि त्याच्या शेजारचा शंकर दरवर्षी त्याच जमिनीतून दोन पिके घेऊन, आपल्या पोरांना शहरात शिकवत होता. पण, रघूला मात्र आळसाने अगदी घट्ट धरले होते. सकाळी कोंबडा आरवला, तरी तो अंथरुणात लोळत पडे. चहा झाला की, तो पारावर जाऊन गप्पा मारत बसे. शेतीची कामे तो उद्यावर ढकले. त्याची बायको सारखी सांगे की, अहो, बांधाची डागडुजी करा, निंदण राहिले आहे, औषध फवारायची वेळ झाली आहे. पण, रघू प्रत्येक वेळी म्हणे, उद्या करू, आज थंडी जास्त आहे, आज ऊन जास्त आहे.

पेरणीचा महिना आला, सगळ्या गावाने पेरण्या केल्या. शंकरने वेळेवर बियाणे आणून पेरणी उरकली, पण रघूने बियाणे आणायलाच दहा दिवस उशीर केला. पेरणी केली, तरी पाणी द्यायला आळस, खत टाकायला आळस. पीक वाढत असताना, त्यात तण माजले, गवत वाढले, पण रघू म्हणाला, पुढच्या आठवड्यात काढू. हळूहळू कीड लागली, पाने पिवळी पडली, तरी तो फवारणीच्या दुकानापर्यंत गेला नाही.

शेवटी कापणीची वेळ आली, तेव्हा शंकरच्या शेतात सोन्याची लोंबी झुलत होती, आणि रघूच्या शेतात केवळ वाळलेले गवत आणि अर्धवट दाणे होते.

व्यापाऱ्याने शेतात येऊन सांगितले की, तुझ्या मालाला बाजारात भाव नाही, कारण दाण्यात वजनच नाही. त्या दिवशी रघूच्या डोळ्यातून पाणी आले. त्याला कळले की, जमीन वाईट नव्हती, नशीबही वाईट नव्हते, वाईट होता तो फक्त त्याचा आळस. त्याने ठरवले की, पुढच्या वर्षी आळसाला जवळही फिरकू देणार नाही, कारण आळस हा माणसाचा असा शत्रू आहे, जो हळूहळू, न दिसता, सगळे नुकसान करून जातो.

आत्मशक्ति



अध्यात्मिक शक्ती

ते खरे आहे की हे कारणा मंडळ अतिशय मोहक आहे. आडवी मंडलरेषा अधिक सूक्ष्म आहे, परंतु आम्हा जर मनाचा ज्ञानाचा अडथळा पडला तर त्याला पुढे जागे पार कठीण होते. आध्यात्मिक पुरुष फक्त ओतण्याला जाणवतात वाचण्याची. अनुभवी मनुष्यांच्या मदतीने आम्ही सूक्ष्म (अंड) व कारण (ब्रह्मांड) मंडलात अडकून पडण्यापासून सुरक्षित राहण्यात यशस्वी होतो. आपणावरील आम्हाला पारखताना जे शक्ती व श्रद्धा मध्ये अडकणाऱ्यापासून वाचवितात. पारखताना आम्हाला अमृतनगर मिळेल, त्याला मानसरोवर म्हणतात. तेथे स्नान करून आत्मा ब्रह्मीला शरीराचा त्याग करतो, आता आत्म्यावर फक्त पापवकाचे पातळसे आवरण असते. हे मंडल मन आणि इंद्रियांच्या शक्तीसहित मंडल आहेत. पारब्रह्माचे कोणता भौतिक भावार्थ वर्णन करता येत नाही. आमच्यातील हलक्या सलाखा उभ्या आहेत.

कारण आपल्यापुढे आमची पिंडी, अंडी व ब्रह्मांडी मनाला खोलवर मंडलात सोडलेले असते. त्यामुळे पारब्रह्माला मानव जातीत काम नसते. हा फक्त आत्मिक अनुभावाचा देश आहे. जेथे व्याख्यानाचा प्रकाशाचा ज्योतीचा व सुधी असलेले स्व-आत्म्याला बाधित करून की तो कुठे आहे, या ठिकाणी आत्मा स्वतःला सर्व सोडून देतो आणि आपल्या वास्तविक प्रकृतीला ओळखतो आणि बोलून उठतो की,

'मी प्रभूचे रूप आहे (सोऽहम)'. आम्हा स्वतः ला ओळखण्याचे निर्देशक पाबरअंती उजाडला गडा आला परमानंदासम् वेगळे ठेवणे, आत्मा परमेश्वराला प्राप्त करण्यासाठी उजळसा होतो, तो पारब्रह्मात रक्षण सतीन करीत नाही. उलट परमेश्वराच्या होऊन आपल्याला ओळखतो. परमात्म्याच्या अंगावर (मांडीवर) ज्याप्रमाणे इच्छा करतो, चालता चालता अशा प्रकारे आत्मा पूर्ण आत्मिक मंडलात म्हणजे सचखंड वा सतलोकांस (आपल्या स्थायी) जाऊन पोहोचतो.

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

नाती घट्ट विणू या

तो मागचा हिशोब त्याला या जन्मात चुकता करावा लागेल. आता जरी त्याने अधिक परिश्रम घेतले तरी त्याला जास्त परिणाम साधता येणार नाहीत. जेव्हा पूर्वजन्मातील कार्मिक खाती वेगळी आहेत तेव्हा वर्तमानात प्रामाणिक स्पर्धा कशी होऊ शकेल? नेहमी लक्षात ठेवा की, आयुष्यात दोन आत्मे कधीच एकमेकांशी स्पर्धा करू शकत नाहीत कारण, त्यांच्या इनपुटचे निकष कधीच एकसारखे नसतात. कशाबद्दल आपण ऐकतो की, दिवसरात्र अभ्यास करणारा मुलगा परीक्षेत नापास झाला आणि दुसरा जो आरामात निघायचा, परीक्षेच्या आदल्या दिवसाही चित्रपट बघायचा, तो उत्तम मार्कांनी पास झाला. त्यावेळी आपल्याला खूप आश्चर्य वाटतं. याचे कारण, एका मुलाने परीक्षेची तयारी आदल्या दिवशी पुस्तक उघडलेले नसते आणि दुसरा मुलगा वर्षभर परीक्षेची तयारी करत असतो. अशा वेळेस आत्मा संपूर्ण चित्र लक्षात घेतलं पाहिजे.

त्याप्रमाणे, जेव्हा आपण स्वतःला किंवा इतरांना पारखतो तेव्हा आपण फक्त वर्तमान जीवनाचा विचार करतो. माझ्याकडे यश मिळवण्यासाठी आवश्यक ती साधनसामग्री असताना आणि मी पुढे का जाऊ शकत नाही, मला माझं ध्येय का गाठता आलं नाही याचं कारण आम्हाला नेहमीच उघड वाटतं. आपण वर्तमानात खूप कष्ट केलेले असतात तरी कधीकधी पूर्वजन्मात केलेले नसतात, जर दुसऱ्या माणसाला त्याच्या पूर्वजन्मातील कार्मिक खात्यात आपल्यापेक्षा जास्त असेल तर आपण त्याच्या बरोबर स्पर्धा कशी करणार ?

सुधा अंधश्रद्धा : महापुरुषांनी माझे अभ्यासन खूप लांब असावंच, माझे सगळे दुःख माझ्या एकट्याच्या नशिबात आहे, परीक्षा देण्याआधी म ला ग्रेडच्या मिनिटांपूर्वीच कधीच अभ्यास करावा लागला नाही.शिवाशिवांसी : सांगतोय लक्षात ठेवा प्रत्यक्षातच जमलं असं नाही, आपल्या प्रत्येकाची प्रामाणिक आणि सरावाची वेगवेगळी असते.सुधा अंधश्रद्धा : हेमा पूज्यमान्य वेत का ?

शिवाशिवांसी : हो, आपली वर्तमानातील बुद्धिमत्ता ही आपले पूर्व कार्मिक खाते आणि पूर्वीच्या संस्कारातून असते.प्रत्येकाचा प्रवास वेगळा असतो हे लक्षात ठेव. पुढे जाणं आपल्या हातात आहे. जर आपण इकडेतिकडे बघत राहिला तर आपण कधीच गाठणार नाही. प्रत्येकाचाच प्रथम वैचारिकदृष्टी !निरंतर प्रेमाकडे घेऊन जाण्याचे मंत्रतुलना आणि स्पर्धा, दुसऱ्यापेक्षा चांगलं करण्याच्या आणि कृतज्ञतेच्या भावनेत येथे आपण इतरांपेक्षा चांगले आहोत ही भावना, आपली किंवा आपल्याच नजरेत वाढवते. व्यावसायिक जगात निर्माण झालेली स्पर्धे ची भावना आपला संस्कार बनते. मग आपला हा संस्कार आपल्याला कुटुंबात आणि मित्रपरिवारात संदर्भावर स्पर्धा करायला लावतो आणि आपली प्रेमाची ऊर्जा रोखतो. (क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : तुम्ही माझं ऐकतच नाही.

नवरा : ऐकतोय तर, पण लक्ष देत नाही.

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जगातील सर्वात लहान खंड कोणता?

– ऑस्ट्रेलिया खंड

– अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

त्याच प्रमाणे तिला चक्कर येणे, डोके दुखणे ही लक्षणे जास्त आढळून येतात. रक्तदाब आठवड्यातून एकदा तपासावा, कारण रक्तदाब जास्त वाढल्यामुळे लक्ष दिले नाही, तर गर्भवतीला झटके येऊ शकतात व बाळ पोटातच दगावण्याची शक्यता असते; म्हणून गर्भवती व तिच्या बाळाच्या आरोग्यासाठी रक्तदाब नियमित तपासणे जरुरीचे असते.

९) क्ष-किरण तपासणी : ही तपासणी गर्भावस्थेमध्ये सहसा टाळलेली बरी परंतु अत्यावश्यक अवस्थेत करण्यास हरकत नाही. काही कारणास्तव क्ष-किरण करण्याची वेळ आल्यास तुम्ही गर्भवती आहात, याची कल्पना डॉक्टरांना द्यावी. म्हणजे ते योग्य पद्धतीने खबरदारी घेऊन क्ष-किरण तपासणी करतील फक्त काही तपासण्या सहसा गरोदरपणात टाळाव्यात.

१०) थायरॉईड तपासणी : गर्भवतीची तपासणी करण्यासाठी रक्ताचा नमुना घ्यावा लागतो. ही तपासणी साधारणतः गर्भावस्थेच्या पहिल्या तीन महिन्यात करून घ्यावी. ही तपासणी केल्यामुळे बाळ आईच्या पोटातच दगावणे व जन्मतः बाळामध्ये व्यंग निर्माण होणे या दुःखद घटना आपण टाळू शकतो. बाळ निरोगी जन्माला येण्यासाठी ही तपासणी करणे आवश्यक आहे.

११) डबल मार्कर : यामध्ये काही प्रमाण बघितले जाते. ही तपासणी साधारणतः गर्भावस्थेच्या नऊ ते दहा आठवड्यामध्ये केली जाते. ही तपासणी करण्यासाठी सोनोग्राफीचा रिपोर्ट सोबत असणे आवश्यक आहे. या तपासणी मधून गर्भामध्ये गुणसूत्रांचे दोष आढळतात का? हे बघितले जाते. त्यातूनच गर्भस्थ बाळाला काही आजार आहे का? हे लक्षात येते. **(क्रमशः)**

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

म्हाडा इमारतींच्या पुनर्किसाचा प्रश्न ऐरणीवर; ८०० ते ९०० रहिवाशांचा जीव आलाय धोक्यात

थकबाकीच्या वादातून म्हाडाकडून विलंब होत असल्याचा नागरिकांचा आरोप

नगर – शहरातील सावेडी रोड परिसरातील सिव्हील हाडको येथील म्हाडा कॉम्प्लेक्समधील १९२ सदनिकांच्या पुनर्विकासाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सुमारे ३८ ते ४० वर्षे जुन्या झालेल्या या इमारतींची अवस्था दिवसेंदिवस धोकादायक होत असून, छतांचे प्लास्टर कोसळणे, भिंतींना तडे जाणे, आरसीसी पिलरला चिरा पडणे तसेच पावसाळ्यात छतांमधून पाणी गळणे अशा समस्यांना रहिवाशांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे सुमारे १९२ कुटुंबांतील ८०० ते ९०० नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.



या पार्श्वभूमीवर सिव्हील हाडको येथील रहिवाशांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेऊन निवेदन दिले. जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून हे निवेदन उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठविण्यात आले असून, इमारतींचा पुनर्विकास तातडीने मार्गी लावण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी यावेळी विजय कल्हापुरे, किशोर बाळके, जयसिंग काळे, विलास गायकवाड, रविंद्र सुपेकर, मकरंद कोर्टीकर, शैलजा जाधव, अमित काळपांडे, शितल गायकवाड, साळुंके, सुरेश घोडके आदी उपस्थित होते.

सुरक्षिततेच्या प्रश्नाकडे पुरेसे लक्षच नाही

सावेडी रोडवरील म्हाडा कॉम्प्लेक्समधील या सदनिका १९८८ च्या सुमारास मध्यम उत्पन्न गटातील नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. मात्र, जवळपास चार दशकांचा कालावधी उलटूनही इमारतींच्या देखभाल आणि सुरक्षिततेच्या प्रश्नाकडे पुरेसे लक्ष दिले गेले नसल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे. घरात जेवण करताना, झोपलेले असताना किंवा बाथरूममध्ये असताना छताचे प्लास्टर अचानक कोसळण्याच्या घटना घडत आहेत. इमारतींच्या भिंतींना आणि आरसीसी पिलरला तडे गेले असून, प्लास्टर सुटत आहे. पावसाळ्यात छतांमधून पाणी गळत असल्याने रहिवाशांचे जगणेही कठीण झाले आहे.

एकदाही स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आलेले नाही

विशेष म्हणजे, गेल्या ३८ ते ४० वर्षांच्या कालावधीत म्हाडा किंवा अहिल्यानगर महानगरपालिकेकडून या इमारतींचे एकदाही स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले नसल्याचा दावा रहिवाशांनी निवेदनात केला आहे. म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष इमारतींची पाहणीही केलेली नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे तातडीने तांत्रिक तपासणी करून इमारतींच्या सुरक्षिततेबाबत अहवाल तयार करावा आणि पुनर्विकासाची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

म्हाडाकडून प्रथम थकबाकी भरण्याची अट

मागील वर्षी ७ एप्रिल २०२५ रोजी म्हाडाच्या कार्यालयाकडून इमारतींच्या दर्शनी भागात पुनर्विकासासंदर्भात नोटीस लावण्यात आली होती. त्यानंतर रहिवाशांनी एकत्रित बैठक घेऊन म्हाडाकडे पुनर्विकासाची प्रक्रिया कशा पद्धतीने राबविणार, सदनिकाधारकांना वाढीव एफएसआयचा लाभ मिळणार का, नवीन सदनिकांचे क्षेत्रफळ किती असेल, याबाबत लेखी प्रश्न उपस्थित केले होते. मात्र, त्यावर म्हाडाकडून प्रथम थकबाकी भरण्याची अट घालण्यात आल्याचे रहिवाशांनी सांगितले.

इमारतींची ढासळती अवस्था चिंताजनक

सध्या या कॉम्प्लेक्समध्ये अनेक ज्येष्ठ नागरिक वास्तव्यास आहेत. इमारतींची ढासळती अवस्था आणि आर्थिक अडचणी यामुळे रहिवासी चिंतेत आहेत. एका बाजूला इमारतींची सुरक्षितता धोक्यात असताना दुसऱ्या बाजूला थकबाकीच्या मुद्द्यावरून पुनर्विकासाची प्रक्रिया रखडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शासनाच्या जागेवर अतिक्रमण करून उभारलेल्या झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासातून नागरिकांना घरे उपलब्ध करून दिली जातात. मात्र, आम्ही पैसे भरून कायदेशीररीत्या सदनिका घेतलेल्या असतानाही आमच्या पुनर्विकासाचा प्रश्न प्रलंबित का, असा सवाल रहिवाशांनी उपस्थित केला आहे. या परिसराचा पुनर्विकास झाल्यास नवीन इमारतींसोबत शासनाच्या शिल्लक सदनिकांची विक्री होऊन शासनालाही आर्थिक फायदा होऊ शकतो, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही साकडे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालून सदनिकाधारकांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा रहिवाशांनी व्यक्त केली आहे. इमारतींचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करावे, थकबाकीच्या प्रकरणाची न्यायालयीन कागदपत्रांच्या आधारे फेरतपासणी करावी आणि १९२ सदनिकांच्या पुनर्विकासाचा प्रश्न कालमर्यादेत मार्गी लावावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रेरणादायी अक्षरधन

अर्धवट ज्ञान घातकच

"मुसाफिर" वाचनीय मनन अक्षर धन संकलन: दिशान फिचर्स

डॉ. मधुकर अष्टीकर लिखीत नंदादीप आजका ९८९०९५६६९५

काय आजवर सगळे होते ठोकळे ? कुणालाही कशातलंही ना कळे ? ज्ञान घरीदारी ठासून भरले. आता लोक जाणतात सगळ्याच ज्ञानक्षेत्रातले सगळे. आता बंद होतील धंदे काळे. वेदकाळी इंद्राने लोकांना चतुरस्त्र केले. पण पुढे काय झाले? ऋग्वेदात म्हटलेय,

त्वं नो अस्या अमतेरुत
क्षुधोभिशस्तेरव स्पुधि ।
त्वं न उतीतव चित्रया धिया शिक्षा
शचिष्ठ गुवित।

हे इंद्रा, तू आम्हाला बुद्धीच्या दारिद्र्यातून मुक्त केलेस. लबाडांचे डावपेच ओळखण्यास शिकवलेस. उपाशी राहू नका म्हणून मार्ग दाखवलेस. भूकबळी का होतात त्याची कारणे आणि ती दूर करणे आमच्या अंगी बाणवलेस. तरी आज परिस्थिती अशी झाली आहे, की तुझे संरक्षण हवे. तुझ्या कुशाग्र बुद्धीची चमकच मार्ग दाखवू शकेल नवे. हतबल झालेत हे सामान्यजनांचे थवे. तू सर्वशक्तिमान। आमच्या प्रार्थनेला दे मान. या लबाडांच्या जीवघेण्या कारवायातून वाचवं आमची मान. नव्या शिक्षणाचे हे वरदान.

वेदकाळी माणसेच होती आणि आजच्या माणसापेक्षा वेगळी नव्हती. कारवाया सारख्याच आणि सारखीच परिस्थिती. तेच प्रश्न, त्याच समस्या, कधी पौर्णिमा, तर लगेच अमावस्या. उगवतो चंद्रमा क्षणिक वाटते, काय अंधाराची तमा? पण लगेच होतो क्षय सुरू. अंधाराचे राज्य लागते पसरू. लोकांना होते नवे नवे ज्ञान. लबाडांचेही सुरु होते नवेनवे कारस्थान. अशा वेळी अर्धवट ज्ञान अज्ञानापेक्षाही भयानक. म्हणूनच कवी उत्तमश्लोक वैद्यकीय व्यवसायातले उदाहरण देतात,

वैद्य करीती उपचार हा तो समजावा उपचार।
मोक्षासाठी कर्मकांड प्रकार
उपचारासारीखाचि प्रचार ।

आयुर्वेदात खरे तर कुपथ्य टाळणे आणि पथ्य पाळणे ही रोगनिवारणांची खरी औषधे. तरी वैद्य उपचार करतात तो केवळ उपचार म्हणून. वैद्याने औषध द्यायचे नाही, तर काय करायचे? लोकांना मानसिक समाधान कसे लाभायचे? अध्यात्मातदेखील मुक्ती मिळविण्यासाठी विषयापासून वैराग्यच हवे. पण संसाराच्या तापत्रयातून मुक्ती मिळवायची तर पूजापाठ, व्रतवैकल्ये करायची. उपचार म्हणून कर्मकांडाचा प्रचार आवश्यक.

एक विनोदी गोष्ट आहे. एक देवदत्त आपल्या पत्नीला डॉक्टरकडे घेऊन गेला. तिला कसला रोग झाला ते कळायला मार्गच नव्हता. ती वर्तमानपत्रे वाचायची. टीव्ही पाहायची, नाना रोगांची लक्षणे वाचायची. ती लक्षणे तिला स्वतःमध्ये दिसायची. मग ती मनातून घाबरायची. म्हणूनच देवदत्त तिला डॉक्टरकडे घेऊन गेला. डॉक्टरने तपासले. देवदत्ताने डॉक्टरच्या चेहऱ्यावरून बायकोला काहीच झाले नाही हे ओळखले आणि म्हटले, हिला तर काहीही झालं नाही डॉक्टर.

डॉक्टर गंभीरपणे म्हणाले, डॉक्टर कोण? तुम्ही की मी? तुमच्यापेक्षा मला जास्त समजतं. तुमच्या पत्नीची अवस्था गंभीर आहे.

पण डॉक्टर ती आज चांगलं जेवली. तिनं पेपर वाचले. हीच तर चूक झाली न समजणाऱ्या रोगाची हीच लक्षणे दिसली. पण डॉक्टर, तुमच्यापेक्षा मला जास्त समजतं.

देवदत्ताने हे सगळं पत्नीला जाऊन सांगितलं. ती एकदम बेशुद्ध होऊन पडली.

डॉक्टर धावत आले. तिला तपासले आणि म्हणाले, आय ॲम व्हेरी सॉरी. ती आपल्याला सोडून गेली.

देवदत्ताची पत्नी दचकली. डोळे उघडून म्हणाली, अहो मी जिवंत आहे. देवदत्त म्हणाला, तुझ्यापेक्षा डॉक्टरला जास्त समजतं.

– किशोर गांधी

सर्व शासकीय- निमशासकीय कामांसाठी एकच सर्वमान्य ओळखपत्र लागू करावे

नगर – आजच्या डिजिटल युगात भारतातील सामान्य नागरिकांना प्रत्येक शासकीय व निमशासकीय कामासाठी वेगवेगळी ओळखपत्रे आणि कागदपत्रे सादर करावी लागतात. आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान ओळखपत्र, रेशन कार्ड, रहिवासी दाखला, जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला अशा विविध कागदपत्रांसाठी नागरिकांना वारंवार शासकीय कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागतात. त्यामुळे शासनाने सर्व शासकीय- निमशासकीय कामांसाठी एकच सर्वमान्य ओळखपत्र लागू करावे अशी मागणी ऋषिकेश गुंडला यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाव्दारे केली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, विशेषतः ग्रामीण भागातील नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग व्यक्ती आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना या प्रक्रियेमुळे मोठा मानसिक, आर्थिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागतो. एखाद्या छोट्याशा कामासाठीही अनेक कागदपत्रांची मागणी केली जाते. कधी ऑनलाइन अर्ज, कधी कागदपत्रांची प्रत, तर कधी प्रत्यक्ष पडताळणीसाठी कार्यालयात उपस्थित राहावे लागते. एकीकडे शासन डिजिटल इंडिया आणि ई-गव्हर्नन्सचा पुरस्कार करत असताना दुसरीकडे सामान्य नागरिकांना कागदपत्रांच्या जंजाळात अडकावे लागत आहे. त्यामुळे सर्व शासकीय व निमशासकीय कामांसाठी एकच सर्वमान्य नागरिक ओळखपत्र उपलब्ध करून द्यावे, उपलब्ध सरकारी डेटाबेसचा वापर करून नागरिकांची माहिती शासनाच्या विविध विभागांना परस्पर उपलब्ध करून द्यावी, एकाच कागदपत्राची वारंवार मागणी करण्याची पद्धत बंद करावी, नागरिकांना एकाच ओळखपत्राच्या आधारे शक्य तितक्या शासकीय सेवा उपलब्ध करून द्याव्यात, कागदपत्रांच्या पडताळणीची प्रक्रिया सुलभ, पारदर्शक आणि वेळेची बचत करणारी करावी, अशी मागणी गुंडला यांनी केली आहे.

श्री सालासर ह्युंदाईमध्ये एकाच दिवसात ५५ गाड्यांची विक्रमी डिलिव्हरी

नगर – दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर नगर एमआयडीसी येथील श्री सालासर ह्युंदाई शोरूममध्ये वाहन खरेदीचा उत्साह अक्षरशः शिगेला पोहोचला असून एकाच दिवसात तब्बल ५५ नव्या चारचाकी वाहनांची डिलिव्हरी देत शोरूमने विक्रीचा उल्लेखनीय टप्पा गाठला आहे.



क्रेटा, व्हेन्यू, एक्स्टर, ऑरा, आय२०, ग्रँड आय१० निओस यांसह विविध मॉडेल्सना ग्राहकांनी पसंती दिली. आकर्षक ऑफर्स, सुलभ फायनान्स सुविधा, विविध वाहन पर्याय आणि ग्राहकाभिमुख सेवेमुळे शोरूममध्ये वाहन खरेदीसाठी गर्दी पाहायला मिळाली आहे. शोरूम व्यवस्थापनाच्या वतीने ग्राहकांना नव्या वाहनांच्या चाव्या सुपूर्द करण्यात आल्या.

एकाच दिवसात ५५ गाड्यांचे वितरण हा ग्राहकांनी श्री सालासर ह्युंदाईवर दाखविलेल्या विश्वासाचा मोठा गौरव असल्याची भावना व्यवस्थापनाने व्यक्त केली असून ग्राहकांच्या प्रेम आणि विश्वासाबद्दल आभार मानत भविष्यातही उत्कृष्ट सेवा, आकर्षक योजना आणि विश्वासार्ह ग्राहकसेवा देण्याचा संकल्प व्यवस्थापनाने केला आहे.



कामू टाटा मोटर्सचा एकाच दिवसात १२१ गाड्यांची विक्री

दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर एमआयडीसी परिसरातील कामू टाटा मोटर्स शोरूममध्ये वाहन खरेदीचा उत्सव रंगला असून ग्राहकांच्या प्रतिसादातून एकाच दिवसात तब्बल १२१ वाहनांची विक्री नोंदवत विक्रीचा नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. पेट्रोल, डिझेल आणि इलेक्ट्रिक अशा तिन्ही प्रकारच्या वाहनांना ग्राहकांनी पसंती दिल्य. सिएरा, पंच, नेक्सॉन, कर्व्ह, अल्ट्रॉझ, टियागो, टिगॉर, हॅरियर आणि सफारी यांसारख्या आकर्षक मॉडेल्सनी ग्राहकांचे विशेष लक्ष वेधून घेतले असून आधुनिक तंत्रज्ञान, दमदार लूक, उत्कृष्ट सुरक्षितता आणि आरामदायी प्रवास यामुळे वाहनांना ग्राहकांची पसंती मिळाली आहे. सकाळपासूनच शोरूममध्ये ग्राहकांची गर्दी उसळली होती.



नगरमध्ये 'डॉ. अनभुलेज डेंटिक'चे उद्घाटन उत्साहात करण्यात आले.

सुंदर हास्याला आधुनिक दंतोपचारांची जोड; नगरमध्ये 'डॉ. अनभुलेज डेंटिक'चे उद्घाटन

नगर – निरोगी दात, आत्मविश्वासपूर्ण हास्य आणि आधुनिक दंतोपचारांची सुविधा आता अहिल्यानगरकरांना एकाच छताखाली उपलब्ध होणार असून नगर-मनमाड रस्त्यावरील श्रद्धा हॉटेलसमोर 'डॉ. अनभुलेज डेंटिक – दंत, लेझर आणि सौंदर्योपचार केंद्र' या अत्याधुनिक दंतचिकित्सालयाचे उद्घाटन करण्यात आले आहे. या नव्या उपक्रमामुळे अहिल्यानगरच्या दंत आरोग्यसेवेत आधुनिक सुविधांची भर पडली असून दंतोपचारांसोबतच अत्याधुनिक लेझर उपचार आणि सौंदर्यविषयक उपचार अशा विविध सेवा या चिकित्सालयात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. माहितीसाठी श्रद्धा हॉटेलसमोर, नगर-मनमाड रस्ता, अहिल्यानगर येथे किंवा ९११२६०६२६२६२.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून रुग्णांना दर्जेदार, विश्वासार्ह आणि काळजीपूर्वक दंतसेवा देण्याचा संकल्प डॉ. स्नेहल सिनारे-अनभुले यांनी केला असून त्यांच्या या नव्या दंतसेवा उपक्रमामुळे नागरिकांना विविध उपचारांसाठी वेगवेगळ्या ठिकाणी जाण्याची गरज कमी होणार आहे. या उद्घाटन सोहळ्याला विशेष कौटुंबिक आणि सामाजिक महत्त्व लाभले असून ॲड. शिवाजी अनभुले यांच्या सून डॉ. स्नेहल सिनारे-अनभुले यांनी वैद्यकीय क्षेत्रात स्वतःच्या कार्यकर्तृत्वातून सुरू केलेल्या या नव्या पर्वाचे उपस्थितांनी कौतुक केले. ॲड. शिवाजी अनभुले यांनी वकिली क्षेत्रात केलेल्या प्रदीर्घ कार्याच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या कुटुंबातील पुढील पिढीने वैद्यकीय क्षेत्रात सुरू केलेला हा उपक्रम विशेष उल्लेखनीय ठरला आहे.

यावेळी डॉ. स्नेहल अनभुले, ॲड. अक्षय अनभुले, ॲड. शिवाजी अनभुले, अनिता अनभुले, प्रा. डॉ. बाबासाहेब सिनारे, प्रमिला सिनारे, ॲड. रमेश कराळे, ॲड. रमेश वाकळे, विवेक म्हसे, भानुदास बेरड, विवेक नाईक, माजी नगरसेवक महेंद्र गंधे, डॉ. भूषण अनभुले, डॉ. रोहित थोरात, डॉ. प्रीती थोरात, डॉ. सुमित नलावडे उपस्थित होते.

बोल फाउंडेशनतर्फे भिंगारमधील १५० हून अधिक कुटुंबांसोबत दिवाळीचा आनंदोत्सव

गरजू महिलांना नवीन साड्यांचे, तर कुटुंबांना दिवाळी मिठाईचे वाटप; सामाजिक बांधिलकीतून माणुसकीचा दीप प्रज्वलित

नगर – 'ब्रेड ऑफ लाईफ' व बोल फाउंडेशनच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही भिंगार येथील इंदिरानगर सेवावस्तीमध्ये दिवाळी आनंदोत्सव साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत वस्तीत राहणाऱ्या १५० हून अधिक कुटुंबांना दिवाळीच्या मिठाईचे पुडे, तसेच १५० हून अधिक महिलांना नवीन साड्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी मिठाईच्या पुड्यांचे वाटप अरविंद कोथापल्ली यांच्या टर्न अराउंड ग्लोबल सर्व्हिसेस या संस्थेच्या सौजन्याने करण्यात आले. तसेच भिंगार येथील रहिवासी दिलीप लालचंद मुनोत यांच्या सौजन्याने इंदिरानगर सेवावस्तीतील महिलांना नवीन साड्यांचे वाटप करण्यात आले.



'ब्रेड ऑफ लाईफ' व बोल फाउंडेशनच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही भिंगार येथील इंदिरानगर सेवावस्तीमध्ये दिवाळी आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी बोल फाउंडेशनचे चेअरमन जोसेफ पाटोळे यांनी दिवाळीचा आनंद समाजातील गरीब, गरजू आणि वंचित घटकांपर्यंत पोहोचला पाहिजे. सण-उत्सवांच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकाशी आपुलकीचे आणि मानवतेचे नाते जोडले गेले पाहिजे. याच सामाजिक भावनेतून बोल फाउंडेशन सातत्याने विविध उपक्रम राबविण्यासाठी कार्यरत असल्याचे सांगितले.

बोल फाउंडेशनच्या सचिव शोभा पाटोळे, फाउंडेशनचे उपाध्यक्ष अमित पाटोळे, श्रद्धा पाटोळे, काव्या पाटोळे व आरुष पाटोळे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना मिठाईचे पुडे व साड्यांचे वाटप करण्यात आले. तसेच स्वयंसेवक अनिकेत पाटोळे, आरती पाटोळे, अंकिता पाटोळे, नीतीन पाटोळे आणि इतर स्वयंसेवकांच्या हस्ते उर्वरित गरजू कुटुंबांपर्यंतही दिवाळी भेट पोहोचविण्यात आली.

यावेळी इंदिरानगर सेवावस्तीतील स्वयंसेवक भाऊसाहेब लक्ष्मण गवळी ऊर्फ अण्णाभाऊ गवळी यांनी बोल फाउंडेशन, देणगीदार आणि उपक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

तसेच सेवावस्तीतील सेविका आरती सदलापुरकर यांनीही फाउंडेशनच्या या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. हा आनंदोत्सव यशस्वी करण्यासाठी नंदा रॉय, सीमा क्षीरसागर, मोनिका वैराळ, वर्षा घोरपडे, सुनीता गवळी, आरती सदलापुरकर, रुपाली भारत ठोकळ, सोनाली उमाप, धनंजय घोरपडे, विनोद उमाप आणि अण्णाभाऊ गवळी यांच्यासह फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी सहकार्य केले.



पेमराज सारडा महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या वेशभूषा स्पर्धेत श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेच्या विद्यार्थिनींनी यश संपादन केले.

वेशभूषा स्पर्धेत श्री समर्थ विद्यामंदिरच्या विद्यार्थिनींचे यश

नगर – विचार भारतीच्या वतीने पेमराज सारडा महाविद्यालय येथे नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या वेशभूषा स्पर्धेत श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले. विविध ऐतिहासिक, सामाजिक आणि कर्तृत्ववान महिलांच्या वेशभूषा साकारत विद्यार्थिनींनी आपल्या कलागुणांचे प्रभावी प्रदर्शन केले. या स्पर्धेत प्रशालेच्या विद्यार्थिनींनी प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवत प्रशालेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

स्पर्धेतील गट क्रमांक २ (इयत्ता पाचवी व सहावी) मध्ये ओवी ललित कुलकर्णी हिने तुळजाभवानी मातेची वेशभूषा साकारत प्रथम क्रमांक मिळविला, तर गौरी संपत कोळेकर हिने राणी लक्ष्मीबाई यांची भूमिका साकारत द्वितीय क्रमांक पटकाविला. गट क्रमांक ३ (इयत्ता सातवी व आठवी) मध्ये श्रीशा पंकज आकडकर हिने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची वेशभूषा साकारत प्रथम क्रमांक मिळविला, तर राजलक्ष्मी अनिल गुंड हिने डॉ. आनंदीबाई जोशी यांची भूमिका साकारत द्वितीय क्रमांक मिळविला.

गट क्रमांक ४ (इयत्ता नववी व दहावी) मध्ये अपूर्वा नितीन खंडागळे हिने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची वेशभूषा साकारत प्रथम क्रमांक मिळविला, तर अंजली दीपक जाधव हिने राजमाता जिजाऊ यांची भूमिका साकारत तृतीय क्रमांक पटकाविला. या सर्व यशस्वी विद्यार्थिनींना प्रशस्तीपत्रक व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

या विद्यार्थिनींना चैताली नवले, ज्योती कोहकडे आणि योगिता कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थिनींना भारतीय इतिहासातील कर्तृत्ववान महिलांचे कार्य, त्यांचे विचार आणि समाजासाठी दिलेले योगदान जाणून घेण्याची संधी मिळाली. या यशाबद्दल शालेय समितीचे चेअरमन किशोर देशपांडे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापिका वसुधा जोशी, पर्यवेक्षिका शारदा होशिंग, सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थिनी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून कौतुक केले.

पार्श्व लुणे याने साकारली 'रायगड किल्ल्याची प्रतिकृती'



पार्श्व लुणे याने साकारलेला रायगड किल्ल्याचा आकर्षक देखावा.

नगर – दिवाळीच्या मुहूर्तावर इयत्ता ९ वीमध्ये शिकणाऱ्या १४ वर्षीय पार्श्व निखिल लुणे याने रायगड किल्ल्याची आकर्षक त्रिमितीय प्रतिकृती (3D Art Model) साकारली आहे. या मॉडेलमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्याची रचना अत्यंत कल्पकतेने दाखवण्यात आली आहे. मुख्य प्रवेशद्वार (महादरवाजा), तटबंदी, बुरुज, राजवाडा, मंदिर, गुप्त गुहा, पाण्याच्या टाक्या, शेती परिसर आणि इतर ऐतिहासिक ठिकाणांची सुंदर मांडणी करण्यात आली आहे. प्रकाशयोजना, लघु प्रतिकृती आणि बारकाव्यांवर विशेष लक्ष देत पार्श्वने आपली कलात्मकता, कल्पकता आणि ऐतिहासिक जाणिवेचा उत्कृष्ट परिचय करून दिला आहे.

यापूर्वी गणेशोत्सव २०२६ निमित्त पार्श्वने कैलास पर्वताची सुंदर कलाकृती साकारली होती. भगवान शंकर, माता पार्वती आणि गणेशमूर्ती यांची आकर्षक मांडणी तसेच हिमाच्छादित पर्वताचा देखावा आणि प्रकाशयोजना यांमुळे या कलाकृतीला विशेष आकर्षण प्राप्त झाले होते. धार्मिक श्रद्धा, कल्पकता आणि कलाकौशल्य यांचा सुंदर संगम त्याच्या या कलाकृतीतून पाहायला मिळाला.

छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास व भारतीय संस्कृतीचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा पार्श्वचा हा कौतुकास्पद प्रयत्न आहे. इतिहासप्रेम, सर्जनशीलता, कल्पकता व मेहनतीचा सुंदर संगम या दोन्ही कलाकृतींतून दिसून येतो. त्याच्या या कलाकृतीने इतिहासप्रेमी व नागरिकांचे लक्ष वेधून घेतले आहे.

अहिल्यानगर येथील 'फिरोदिया शिवाजियन्सचा संघ' ऑल इंडिया गडहिंग्लज युनायटेड फुटबॉलसाठी रवाना

देशभरातील नामांकित संघांबरोबर करणार स्पर्धा



नगर – अहिल्यानगरचा फिरोदिया शिवाजियन्स एफसी संघ ऑल इंडिया गडहिंग्लज युनायटेड फुटबॉल स्पर्धेसाठी रवाना झाला आहे. या स्पर्धेला ५० वर्षांहून अधिक वर्षांची गौरवशाली परंपरा असून देशभरातील अनेक नामांकित व बलाढ्य संघ या स्पर्धेत सहभागी होतात.

ही स्पर्धा अखिल भारतीय फुटबॉल महासंघाच्या (AIFF) मार्गदर्शक तत्त्वांनुसार तसेच कॉम्पिटिशन मॅनेजमेंट सिस्टीम (CMS) अंतर्गत आयोजित केली जाते. या हंगामातील फिरोदिया शिवाजियन्स एफसी संघाची ही पहिलीच बाहेरगावची स्पर्धा असून आगामी महाराष्ट्र राज्य वरिष्ठ फुटबॉल लीग चॅम्पियनशिपच्या तयारीच्या दृष्टीने ही स्पर्धा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

या स्पर्धेच्या तयारीसाठी फरोदिया शिवाजियन्स संघाला पुण्याचे जॉर्डन फर्नांडिस यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. जॉर्डन हे दुसऱ्या पिढीतील शिवाजियन्स खेळाडू असून त्यांनी भारतातील अनेक नामांकित क्लबकडून फुटबॉल खेळला आहे. तसेच जर्मनीतील लीग फुटबॉल स्पर्धांमध्येही खेळण्याचा अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. त्यांच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभवाचा फायदा संघातील खेळाडूंना शिस्त, खेळातील डावपेच आणि संघबांधणीच्या दृष्टीने होत आहे. राजेश अँथनी हे संघ व्यवस्थापक म्हणून संघासोबत रवाना झाले आहेत. स्पर्धेदरम्यान संघाचे नियोजन व व्यवस्थापनाची जबाबदारी ते सांभाळणार आहेत.

अहिल्यानगरच्या फुटबॉल क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणारा फिरोदिया शिवाजियन्स एफसी संघ या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत देशातील बलाढ्य संघांविरुद्ध आपली ताकद आजमावण्यासाठी सज्ज झाला आहे. या स्पर्धेमुळे खेळाडूंना उच्च दर्जाच्या फुटबॉलचा अनुभव मिळणार असून आगामी महाराष्ट्र राज्य वरिष्ठ लीग स्पर्धेपूर्वी संघाच्या तयारीचा आढावा घेण्याची संधी मिळाली आहे.

या स्पर्धेत संघ उत्तम कामगिरी करेल आणि आगामी राज्य लीग स्पर्धेसाठी अधिक सक्षम बनेल असा विश्वास क्लबचे सहमालक नरेंद्र फिरोदिया आणि मनोज वाळवेकर यांनी व्यक्त केला असून संघाला स्पर्धेसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य युवा फुटबॉल लीगसाठी फिरोदिया शिवाजियन्सचा संघ शिरपूरला रवाना

सलग तिसऱ्या वर्षी अहिल्यानगरचे प्रतिनिधित्व; पहिला सामना स्पोर्टिंग क्लब द ठाणे संघाविरुद्ध



नगर – वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन आयोजित महाराष्ट्र राज्य युवा फुटबॉल लीग २०२६–२७ स्पर्धेसाठी फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमीचा १५ वर्षांखालील मुलांचा संघ नुकतेच शिरपूर (जि. धुळे) येथे रवाना झाला.

स्पर्धेचा पहिला टप्पा १४ ते २१ नोव्हेंबर दरम्यान होणार असून फिरोदिया शिवाजियन्सचा पहिला सामना स्पोर्टिंग क्लब द ठाणे संघाविरुद्ध होणार आहे. दोन टप्प्यांत संघ एकूण १० सामने खेळणार आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रातील नामांकित फुटबॉल क्लब आणि अकॅडमी सहभागी होत आहेत.

त्यामध्ये डिसोझा फुटबॉल अकॅडमी मुंबई, स्पोर्टिंग क्लब द ठाणे, डेरवण एफसी, वसई विरार युनायटेड फुटबॉल असोसिएशन, स्टेपओव्हर फुटबॉल अकॅडमी, एसव्हीकेएम स्पोर्ट्स अकॅडमी धुळे, साऊथ वेस्ट ब्ल्यू नागपूर, ध्रुव युनायटेड नाशिक आणि एसजी ५ फुटबॉल क्लब हिंगोली यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र शासनाचा महत्त्वाकांक्षी फुटबॉल विकास प्रकल्प 'प्रोजेक्ट महादेवा' हे देखील या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण असणार आहे. फिरोदिया शिवाजियन्स सलग तिसऱ्या वर्षी या राज्यस्तरीय लीग मध्ये अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत आहे.

फिरोदिया शिवाजियन्स संघात हर्षद सोनावणे (कर्णधार), सम्राट आव्हाड (उपकर्णधार), शौर्य मोरे, शौर्य चंगेडिया, भार्गव साळुंखे, संकेत गव्हाणे, श्रेयांक पांडे, अर्णव सप्तर्षी, सोहम हिंगे, तनिश पडागळे, अर्णव चव्हाण, धनुष धांडे, अर्णव जोशीलकर, अभिषेक सासणे, पार्थ ताठे, अनमोल काळे यांचा समावेश आहे.

संघासोबत प्रशिक्षक जेव्हिअर स्वामी आणि व्यवस्थापक व फिजिओथेरपिस्ट डॉ. प्रियदर्शिनी सूर्यवंशी असणार आहेत. या स्पर्धेसाठी संघाच्या तयारीत मुख्य प्रशिक्षक जॉर्डन फर्नांडिस तसेच क्लब कमिटी सदस्य पल्लवी सैदाणे, अभिषेक सोनवणे, राजेश अँथनी आणि सचिन पात्रे यांनी परिश्रम घेतले आहे. राज्यातील उत्कृष्ट संघांशी सामना करण्याची संधी आपल्या खेळाडूंसाठी महत्त्वाची आहे. या अनुभवातून भविष्यात आणखी चांगले फुटबॉलपटू घडतील, असा विश्वास क्लबचे सहमालक नरेंद्र फिरोदिया आणि मनोज वाळवेकर यांनी व्यक्त करुन संघाला या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

झेंडीगेट येथील श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिरात 'दिव्य अन्नकोट व छप्पन भोग महोत्सव' उत्साहात

५६ प्रकारच्या खाद्यपदार्थांचा नैवेद्य; हनुमान चालीसा, महाआरती आणि महाप्रसादाचे आयोजन



नगर – झेंडीगेट येथील श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या वतीने दिव्य अन्नकोट व छप्पन भोग महोत्सव उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने भगवान हनुमान यांना ५६ प्रकारच्या विविध खाद्यपदार्थांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. यावेळी हनुमान चालीसाचे पठण, महाआरती तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

दीपावली सणानंतर भगवान श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत उचलला, त्यावेळी त्यांना ५६ प्रकारचे नैवेद्य अर्पण करण्यात आले होते, अशी धार्मिक मान्यता आहे. याच परंपरेनुसार दिव्य अन्नकोट व छप्पन भोग महोत्सव संपूर्ण भारतात उत्साहात साजरा केला जातो. हा महोत्सव केवळ धार्मिक सोहळा नसून भक्ती, श्रद्धा, अन्नदान, सेवा आणि सामाजिक एकतेचा सुंदर संगम आहे. देवाला अर्पण केलेला प्रसाद भाविकांना वाटप करून आनंद आणि भक्तिभावाचा प्रसार केला जातो.

श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिरातही हा उत्सव पारंपरिक आणि धार्मिक पद्धतीने साजरा करण्यात आला. मंदिराच्या वतीने ५६ प्रकारच्या खाद्यपदार्थांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. त्यानंतर हनुमान चालीसाचे पठण, महाआरती आणि भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी मोहन मानधना, नगरसेवक सागर मुर्तडकर, बजरंग दरक, साईनाथ कावट, रामदास कावट, राजेंद्र खंडेलवाल, अनिल झवर, बद्रीनाथ राठी, नंदू झवर, राहुल कावट, शरद झंवर, योगेश पाटील, विजय थोरात, कुणाल कावट, आशिष कावट आदींसह भाविक उपस्थित होते.

दिवाळी अंकांची मोफत वाचन सुविधा



स्व. छायाताई अमृत गांधी यांच्या स्मरणार्थ दरवर्षीप्रमाणे अमृत अभय गांधी यांनी नामांकित व दर्जेदार ३१ दिवाळी अंक वाचनप्रेमी रसिकांसाठी विनामूल्य उपलब्ध करून दिले आहेत.

नगर – स्व. छायाताई अमृत गांधी यांच्या स्मरणार्थ दरवर्षीप्रमाणे अमृत अभय गांधी यांनी नामांकित व दर्जेदार ३१ दिवाळी अंक वाचनप्रेमी रसिकांसाठी विनामूल्य उपलब्ध करून दिले आहेत. या अंक वाटपाचा शुभारंभ भाऊबीजेच्या मुहूर्तावर करण्यात आला. यावेळी रमेश बोरा, प्रमोद गादिया, राजेंद्र कटारिया यांची समयोचित भाषणे झाली.

ज्या रसिकांना अंक वाचावयाचे आहेत, त्यांनी अर्बन बँक कॉलनी, आगरकर मळा येथील निवासस्थानातून संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत अंक घेऊन जावेत व ७ दिवसांनी बदलून नवीन अंक घेऊन जावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी ९८९०२१०४०१ या क्रमांकावर संपर्क साधावा. या प्रसंगी आगरकर मळा ज्येष्ठ नागरिक संघ आणि महावीर श्रावक संघाचे सभासद अशोक आगरकर, अनिल मुथा, नाना दळवी, श्रीकृष्ण लांडगे, फुलसौंदर, प्रमोद गादिया, राजेंद्र कटारिया, लता वर्मा, अमृत गांधी, अभय गांधी, वंदना गांधी, वृषभ गांधी, रमेश बोरा आदी उपस्थित होते.

कथा जीवनातील व्यथा दूर करत असते

ह.भ.प. समाधान महाराज शर्मा



दिल्लीगेट येथे श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर व श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट यांच्या वतीने तसेच उपमहापौर धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून आयोजित शिवमहापुराण कथा सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशी ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी रुद्र संहितेचे निरूपण केले. (छायाचित्र : लहू दळवी)

नगर – भारतीय संस्कृती महान असून, त्यामध्ये अध्यात्म आणि धार्मिकतेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भगवान महादेवांचे आपल्या जीवनातील स्थान मोठे आहे. श्रद्धा असेल तर दगडातही महादेव दिसतात. कथा जीवनातील व्यथा दूर करत असते, त्यामुळे प्रत्येकाने भक्तिभावाने कथेचे श्रवण करावे, असे प्रतिपादन कथा प्रवक्ते ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी केले.

दिल्लीगेट येथे श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर व श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट यांच्या वतीने तसेच उपमहापौर धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून आयोजित शिवमहापुराण कथा सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशी ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांनी रुद्र संहितेचे निरूपण केले. यावेळी त्यांनी भगवान महादेवांचे महत्त्व, शिवभक्ती आणि भारतीय संस्कृतीतील धार्मिक परंपरांचे महत्त्व विविध उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केले.

ह.भ.प. समाधान महाराज शर्मा म्हणाले की, भगवान महादेवांना पंचमुखी म्हटले जाते. प्रत्येकाने एका देवाची मनोभावे तपस्या करावी. श्रद्धा आणि भक्तीने केलेली उपासना मनाला समाधान देते. आजचे जग डिजिटल झाले असून देवसुद्धा डिजिटल झाले आहेत. पूर्वी या जन्मात केलेल्या पापाचे फळ पुढच्या पिढीला भोगावे लागते, असे म्हटले जायचे; मात्र आता माणसाला आपल्या कर्माचे फळ याच जन्मात भोगावे लागते. जो जीवनात पाप करतो, तो नेहमी भयभीत असतो.

आज कुटुंबातील सदस्य एकमेकांपासून दूर

पूर्वी दिवाळीच्या सणाला संपूर्ण कुटुंब एकत्र येऊन चिवडा खात आनंद साजरा करायचे; मात्र आज कुटुंबातील सदस्य एकमेकांपासून दूर जात असल्याचे चित्र दिसत आहे. रुद्राक्ष हे भोलेनाथाचे रूप मानले जाते. त्यामुळे प्रत्येकाने आनंदाने देवधर्म आणि भक्ती करावी. कथा जीवनातील व्यथा दूर करत असते, म्हणून प्रत्येकाने कथेचे श्रवण करावे, असे आवाहन त्यांनी केले.

श्रद्धा, संयम आणि भक्ती सोडू नये

ते पुढे म्हणाले की, जीवनात कितीही संकटे आली तरी श्रद्धा, संयम आणि भक्ती सोडू नये. अहंकाराचा त्याग करून सत्याच्या मार्गाने चालावे. भगवान शिव हे भक्तांच्या श्रद्धेला महत्त्व देणारे देव आहेत. त्यांच्या भक्ती मुळे आणि कृपेमुळे जीवनाला योग्य दिशा मिळते. या संहितेतून भगवान महादेवांचे चरित्र समजण्याबरोबरच आध्यात्मिक ज्ञान आणि जीवन जगण्याची योग्य दिशा मिळते.

भाविकांची मोठी उपस्थिती

यावेळी राजाभाऊ कोठारी, शहर पोलीस उपअधीक्षक दिलीप टिपरसे, प्रा. माणिकराव विधाते, माजी स्थायी समिती सभापती किशोर डागवाले, पुष्कर कुलकर्णी, नगरसेवक सागर मुर्तडकर, उपायुक्त मेहेर लहारे, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे व्यंकटेश कुलकर्णी, अभाविप दक्षिण अहिल्यानगर जिल्हा संयोजक रोहन भुजबळ, अहिल्यानगर महानगरमंत्री उत्कर्ष परदेशी, केडगाव नगरमंत्री प्रेम गायकवाड, बाळासाहेब भुजबळ, विनोद पुंड, अमोल भांबरकर, संजय गारुडकर, डॉ.रणजीत सत्रे, अनिल इवळे, राजेंद्र ताठे, चंद्रकांत पुंड, कॅप्टन सुधीर पुंड, रमेश चिपाडे, सुधाकर कानडे, विजयकुमार बोरुडे, सुरेश जाधव, रोहित पठारे, मनोज भुजबळ, रामदास फुले, आर्यन गिरमे आदींसह भाविक उपस्थित होते.

दिल्लीगेट येथे शिवमहापुराण कथा सप्ताहाचा दुसरा दिवस भक्तिमय वातावरणात



पारस नवजीवन घरकुल प्रकल्पात आनंद आशिष मंडळाच्या सहकार्यातून नवकार प्रार्थना मंडळाची स्थापना झाली.

पारस नवजीवन घरकुल प्रकल्पात नवकार प्रार्थना मंडळाची स्थापना

नगर – दिवाळीच्या मंगलपर्वाचे औचित्य साधून श्री बडीसाजन ओसवाल श्री संघाच्या केडगाव येथील पारस नवजीवन घरकुल प्रकल्पात नवकार प्रार्थना मंडळाची स्थापना करण्यात आली. आनंद आशिष मंडळाच्या सहकार्यातून या प्रार्थना मंडळाची स्थापना झाली. या निमित्ताने अपार्टमेंट मधील रहिवाश्यांनी नवकार महामंत्राचा जाप केला. यावेळी श्री बडीसाजन ओसवाल श्री संघाचे उपाध्यक्ष अजित कर्नावट, मिलिंद जांगडा, राजेंद्र ताथेड, राजेंद बोथरा, राजेंद्र बलडोटा, प्रफुल्ल चोरडीया आदींसह मंडळाचे सदस्य व नागरिक उपस्थित होते.

यावेळी अजित कर्नावट म्हणाले, मंडळाच्या वतीने जैन समाजात अत्यंत महत्व व पवित्र असलेल्या नवकार महामंत्राचा जाप दर गुरुवारी शहरातील विविध भागांमध्ये करण्यात येत आहे. मंडळाच्या माध्यमातून पारस नवजीवन घरकुल प्रकल्पात आता नवकार प्रार्थना मंडळाची स्थापना झाली आहे. आता येथेही दर गुरुवारी नवकार मंत्राचा जाप होणार आहे. या प्रकल्पातील व परिसरातील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

अर्थजगत

आयकर विभागाची नोटीस आली आहे का?



प्राप्तीकर विभागाने चालू आर्थिक वर्षात कर संकलनातील गळती रोखण्यासाठी आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी परदेशातील आर्थिक व्यवहारांची तपासणी वेगाने सुरू केली आहे. ज्या करदात्यांनी परदेशातील बँक खाती, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे समभाग किंवा तेथील स्थावर मालमत्ता यांची माहिती आपल्या विवरणपत्रात दिली नाही, त्यांना थेट नोटिसा पाठवण्यास सुरुवात झाली आहे. विशेषतः माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील ज्या कर्मचाऱ्यांना परदेशी कंपन्यांकडून कर्मचारी समभाग पर्याय योजना म्हणजेच ईसॉप्स मिळाले आहेत, अशा अनेक कर्मचाऱ्यांनी ही मालमत्ता कर विवरणपत्रातील विदेशी मालमत्ता विभागात नोंदवलेली नाही. ही बाब लक्षात घेऊन कर विभागाने अशा करदात्यांना सुधारित विवरणपत्र भरून आपली मालमत्ता जाहीर करण्यासाठी संधी उपलब्ध करून दिली आहे.

कर कायद्यानुसार भारतीय रहिवासी असलेल्या कोणत्याही व्यक्तीला परदेशातून मिळालेले उत्पन्न अथवा तेथील मालमत्ता कर विवरणपत्रात दाखवणे बंधनकारक असते. करदात्याला परदेशातील समभागांवर कोणताही प्रत्यक्ष नफा झालेला नसला, तरी केवळ ती मालमत्ता खात्यात असणे हीच तिच्या नोंदीसाठी पुरेशी ठरते. अनेक करदाते केवळ भारतात मिळालेल्या वेतनावर समाधान मानून परदेशी गुंतवणुकीची नोंद करण्याचे टाळतात. मात्र, सध्या आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध देशांच्या कर यंत्रणांमध्ये स्वयंचलित माहितीची देवाणघेवाण होत असल्याने अशा खात्यांची माहिती प्राप्तीकर विभागाला सहज उपलब्ध होत आहे.

करदात्यांनी दिलेल्या मुदतीत ही चूक दुरुस्त न केल्यास काळा पैसा कायद्यांतर्गत दहा लाख रुपयांपर्यंतच्या दंडात्मक कारवाईची आणि खटल्याची कायदेशीर तरतूद आहे. याव्यतिरिक्त घरगुती व्यवहारांमध्येही 'ॲन्युअल इन्फॉर्मेशन स्टेटमेंट' (एआयएस) द्वारे मोठ्या बँक ठेवी, समभाग खरेदी-विक्री आणि स्थावर मालमत्तांच्या खरेदीचे डिजिटल पुरावे तपासले जात आहेत. त्यामुळे करदात्यांनी कोणत्याही अनधिकृत सल्ल्याला बळी न पडता मान्यताप्राप्त कर सल्लागाराच्या मदतीने आपली सर्व जुनी विवरणपत्रे तपासून घ्यावीत आणि पारदर्शकपणे सर्व आर्थिक व्यवहार नोंदवून संभाव्य कायदेशीर कारवाईपासून स्वतःचा बचाव करावा.

◆◆◆



विम्याचे संरक्षण आणि परतावा

देशातील सर्वात मोठी विमा कंपनी असलेल्या भारतीय आयुर्विमा महामंडळाने (एलआयसी) चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत १२ हजार ७६ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवला असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत यात २० टक्क्यांची मोठी वाढ झाली आहे. कंपनीच्या निव्वळ हप्त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातही १६ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ नोंदवली गेली आहे. विमा उद्योगातील ही दमदार आकडेवारी देशात विम्याविषयी वाढणारी जागरूकता दर्शवत असली, तरी सामान्य ग्राहकांच्या दृष्टीने विम्यातून मिळणारे प्रत्यक्ष संरक्षण आणि परतावा यातील फरक समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे.


अनेक ग्राहक आजही विम्याकडे केवळ कर बचतीचे किंवा सुरक्षित गुंतवणुकीचे साधन म्हणून पाहतात. परिणामी, पारंपरिक बचत योजना किंवा मनी-बॅक पॉलिसी खरेदी केल्या जातात, ज्यामध्ये मिळणारे विमा संरक्षण हे संबंधित कुटुंबाच्या आर्थिक गरजांच्या तुलनेत अत्यंत तोकडे असते. एखाद्या व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न दहा लाख रुपये असल्यास त्याचे जीवन विमा संरक्षण किमान एक कोटी ते दीड कोटी रुपये असणे आवश्यक मानले जाते. पारंपरिक योजनांमध्ये इतके मोठे संरक्षण मिळवण्यासाठी वार्षिक हप्त्याची रक्कम सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जाते. म्हणूनच गुंतवणूक आणि विमा यांची गल्लत न करता केवळ शुद्ध संरक्षण देणाऱ्या मुदत विम्याची (टर्म इन्शुरन्स) निवड करणे हाच आर्थिक नियोजनाचा सुवर्ण नियम आहे. दुसऱ्या बाजूला आरोग्य विमा क्षेत्रातही वैद्यकीय उपचारांच्या महागाईमुळे हप्त्यांमध्ये वाढ होत आहे.

अशा वेळी विमा खरेदी करताना केवळ दाव्यांची पूर्तता पाहण्याऐवजी पॉलिसीमधील खोलीभाड्याच्या मर्यादा (रूम रेंट कॅपिंग), विशिष्ट आजारांवरील कमाल खर्च आणि सह-भरणा (को-पेमेंट) यांसारख्या अटी बारकाईने तपासल्या पाहिजेत. विमा नियामकाने (इर्डा) अलीकडेच ज्येष्ठ नागरिकांसाठी वयाच्या मर्यादा शिथिल केल्या असल्या, तरी पूर्व अस्तित्वात असलेल्या आजारांची माहिती प्रस्तावात अचूक देणे अनिवार्य आहे.

◆◆◆

अल्पबचत योजना ठरताहेत आधारवड

भाडेतत्त्वावर दैनिक गरजांच्या वाढत्या किमती आणि जीवनशैलीवरील खर्च यामुळे महिन्याचा ताळेबंद सांभाळून नियमित बचत करणे हे मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी एक मोठे आव्हान बनले आहे. मात्र, अर्थशास्त्राचा नियम सांगतो की, खर्च करून उरलेले पैसे वाचवण्यापेक्षा महिना सुरू होताच उत्पन्नातील ठरावीक हिस्सा आधी बचतीसाठी बाजूला ठेवणे आवश्यक असते. महागाईचा दर ५ ते ६ टक्क्यांच्या आसपास रेंगाळत असताना, केवळ बचत खात्यात पैसे पडून राहिल्यास त्याचे वास्तविक मूल्य कमी होते. म्हणूनच भांडवलाची १०० टक्के सुरक्षितता आणि निश्चित परतावा देणाऱ्या सरकारी अल्पबचत योजनांकडे बचतीचा मुख्य आधार म्हणून पाहिले पाहिजे.



केंद्र सरकारद्वारे संचलित 'सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी' (पीपीएफ), राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र (एनएससी) आणि 'ज्येष्ठ नागरिक बचत योजना' (एससीएसएस) या योजनांमध्ये सामान्य गुंतवणूकदारांना करमुक्त आणि चांगला व्याजदर मिळतो. विशेषतः ज्या कुटुंबांमध्ये लहान मुली आहेत, त्यांच्यासाठी 'सुकन्या समृद्धी योजना' ही ८ टक्क्यांहून अधिक व्याज देणारी आणि मुलीच्या उच्च शिक्षणासाठी मोठा निधी उभा करणारी सर्वोत्तम बचत योजना ठरली आहे. या योजनांमध्ये मिळणारे व्याज हे चक्रवाढ पद्धतीने वाढत असल्याने दीर्घ मुदतीत लहान लहान बचतीतूनही लाखो रुपयांचे भांडवल सहज उभे राहते.

प्रत्येक नोकरदार आणि व्यावसायिक व्यक्तीने सर्वात आधी आपल्या कुटुंबासाठी किमान ६ महिन्यांचा अनिवार्य खर्च भागवता येईल इतका आणीबाणी निधी (इमर्जन्सी फंड) तयार केला पाहिजे. हा निधी अचानक उद्भवणारे आजारपण किंवा नोकरीतील तात्पुरती अडचण या काळात कर्ज घेण्याची वेळ येऊ देत नाही. हा आणीबाणीचा पैसा नेहमी सहज काढता येईल अशा बँकेच्या बचत खात्यात किंवा लिक्विड फंडात ठेवावा. दरमहा उत्पन्नातील किमान २० टक्के रक्कम नियमित बचतीकडे वळवून तिची सुरक्षित योजनांमध्ये विभागणी करणे हीच आर्थिक स्वावलंबनाची मजबूत पायाभरणी ठरते.

◆◆◆

सुरक्षित मानल्या जाणाऱ्या डेट म्युच्युअल फंडामध्ये गुंतवणूक करताना बहुतांश किरकोळ गुंतवणूकदार केवळ त्या फंडाचा 'यील्ड टू मॅच्युरिटी' अर्थात वायटीएम किती आहे, या एकाच घटकाकडे पाहून पैसे गुंतवण्याची मोठी चूक करतात.

'वायटीएम'च्या मोहात अडकू नका !

बाजारातील इतर पर्यायांपेक्षा एखाद्या फंडात जास्त वायटीएम दिसत असल्यामुळे त्यातून अधिक परतावा मिळेल असा सर्वसामान्य आणि वरवरचा समज असतो. मात्र, डेट फंडाच्या जगात जास्त वायटीएम हा अनेकदा लपलेल्या अतिरिक्त जोखमीचा स्पष्ट संकेत असतो. हा आकडा म्हणजे खात्रीशीर मिळणारा परतावा नसून, जर पोर्टफोलिओमधील सर्व रोखे मुदतीपर्यंत टिकवून ठेवले आणि कोणीही परतफेडीत कसूर केली नाही, तर मिळणारा संभाव्य परतावा असतो, हे वास्तव समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

डेट फंड हे प्रामुख्याने केंद्र व राज्य सरकारी रोखे, सरकारी उपक्रम, बँकांची ठेव प्रमाणपत्रे आणि विविध खासगी कंपन्यांच्या कर्जरोख्यांमध्ये (बॉण्ड्स) पैसे गुंतवतात. बाजारातील सरासरीपेक्षा एखाद्या फंडाचा वायटीएम खूप जास्त दिसत असेल, तर त्या फंड व्यवस्थापकाने जास्त व्याजाच्या मोहापायी कमी पत दर्जा (क्रेडिट रेटिंग) असलेल्या कंपन्यांच्या रोख्यांमध्ये गुंतवणूक केलेली असण्याची शक्यता दाट असते. आर्थिक अडचणीत असलेल्या किंवा नवीन कंपन्या बाजारातून निधी उभारण्यासाठी जास्त व्याज देतात. मात्र अशा कंपन्यांकडून आर्थिक संकट आल्यास व्याज अथवा मुद्दल बुडण्याचा म्हणजेच दिवाळखोरीचा धोकाही तितकाच मोठा असतो, ज्याचा फटका थेट गुंतवणूकदारांच्या मूळ भांडवलाला बसू शकतो.

याशिवाय डेट फंडांवर बाजारातील चालू व्याजदरांच्या हालचालींचा थेट परिणाम होत असतो. फंडाचा सरासरी कालावधी (मॅकॉले ड्युरेशन) किती आहे, हे तपासणे अत्यंत



आवश्यक मानले जाते. जर फंडात दीर्घ मुदतीचे रोखे असतील आणि रिझर्व्ह बँकेने व्याजदरात वाढ केली, तर त्या रोख्यांच्या बाजारभावात वेगाने घसरण होते, ज्यामुळे फंडाचे निव्वळ मालमत्ता मूल्य (एनएव्ही) खाली येते. उलटपक्षी, व्याजदर कपातीच्या काळात अशा फंडांना फायदा होतो.

डेट फंड निवडताना केवळ वायटीएमच्या आकड्यावर न भुलता त्या योजनेचा पत दर्जा तपासावा. पोर्टफोलिओमध्ये 'एएए' (ट्रिपल ए) मानांकित सर्वोत्तम कंपन्या आणि सरकारी रोख्यांचे प्रमाण किती आहे, हे आवर्जून पाहिले पाहिजे. तसेच फंड व्यवस्थापकाने एकाच कंपनीत मोठी रक्कम गुंतवण्याऐवजी ती अनेक क्षेत्रांमध्ये विखुरली आहे का आणि फंडाचा वार्षिक व्यवस्थापन खर्च (एक्स्पेन्स रेशो) वाजवी आहे का, याची खात्री करूनच निर्णय घेतला पाहिजे.

◆◆◆

कर्जदारांना दिलासा नाहीच?

रिझर्व्ह बँकेकडून नजीकच्या काळात व्याजदर कपात केली जाईल आणि कर्जाचे मासिक हप्ते (ईएमआय) कमी होतील अशी आशा बाळगणाऱ्या मध्यमवर्गीय कर्जदारांना आणखी काही काळ वाट पाहावी लागण्याची चिन्हे आहेत. देशातील आघाडीच्या बँकिंग तज्ज्ञांनी आणि वित्तीय विश्लेषकांनी व्यक्त केलेल्या अंदाजानुसार, महागाईचा दबाव आणि जागतिक पातळीवरील अनिश्चितता पाहता मध्यवर्ती बँक व्याजदरात आणखी ०.५० ते ०.७५ टक्क्यांची वाढ करू शकते. अन्नधान्याच्या किमतीतील चढ-उतार



नियंत्रणात आणण्यासाठी व्याजदर चढे ठेवणे हे रिझर्व्ह बँकेचे मुख्य धोरण राहिले आहे. यामुळे गृहकर्ज, वाहन कर्ज आणि वैयक्तिक कर्जाच्या व्याजदरांमध्ये नजीकच्या भविष्यात कोणतीही घट होण्याची शक्यता धूसर बनली आहे.

बँकिंग क्षेत्रातील या स्थितीचा थेट फटका कर्जदारांना बसत असताना, मुदत ठेवीदारांसाठी मात्र हा काळ अत्यंत फायदेशीर ठरत आहे. बँकांकडे सध्या कर्ज वितरणाच्या तुलनेत ठेवींची वाढ संथ गतीने होत असल्याने, तरलतेची चणचण भरून काढण्यासाठी बँकांमध्ये ठेवीदारांना आकर्षित करण्याची स्पर्धा लागली आहे. विविध सरकारी आणि खाजगी बँका ४०० ते ५०० दिवसांच्या विशेष मुदत ठेवींवर सर्वसामान्य नागरिकांना ७.२५ ते ७.७५ टक्के, तर ज्येष्ठ नागरिकांना ८.२५ टक्क्यांपर्यंत निश्चित व्याज देत आहेत. ज्या नागरिकांना समभाग बाजारातील जोखीम पत्करायची नाही, त्यांच्यासाठी हा व्याजदर निश्चित उत्पन्न मिळवण्यासाठी अतिशय आकर्षक मानला जात आहे. ठेवीदारांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेताना सुरक्षिततेचे मूलभूत नियम विसरता कामा नयेत. रिझर्व्ह बँकेच्या अखत्यारीतील विमा महामंडळानुसार (डीआयसीजीसी) प्रत्येक बँकेत प्रति खातेदार केवळ पाच लाख रुपयांपर्यंतच्या ठेवींनाच सरकारी विमा संरक्षण असते. त्यामुळे जर कोणाकडे वीस लाख रुपयांची मोठी पुंजी असेल, तर ती एकाच बँकेत न ठेवता तीन ते चार वेगवेगळ्या अनुसूचित बँकांमध्ये प्रत्येकी पाच लाख रुपयांच्या मर्यादेत विभागून ठेवावी. यामुळे जास्तीत जास्त व्याजाचा लाभही मिळवता येतो आणि संपूर्ण भांडवल १०० टक्के सुरक्षित राहते.

◆◆◆

उसळीनंतर समभाग खरेदी करताय?

चालू आठवड्यात भारतीय भांडवली बाजारात ऐतिहासिक उसळी पाहायला मिळाली. अमेरिकेतील मध्यावधीचे निकाल जाहीर झाले आणि इराणने भारतासह ४ देशांना हार्मुझमधून वाहतुकीस मोकळीक दिली, याचे पडसाद भांडवली बाजारात उमटले. सेन्सेक्सने २००० हून अधिक अंकांची झेप घेतली, तर निफ्टीने २४ हजार ५०० ची महत्त्वाची पातळी ओलांडली. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली मोठी घसरण आणि परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (एफपीआय) माहिती तंत्रज्ञान व दूरसंचार क्षेत्रातील समभागांमध्ये पुन्हा सुरू केलेली



जोरदार खरेदी हीदेखील या तेजीला कारणीभूत ठरली. सलग काही सत्रांच्या घसरणीनंतर बाजारात परतलेल्या या चैतन्यामुळे एकाच दिवसात गुंतवणूकदारांच्या संपत्तीत सुमारे सात लाख कोटी रुपयांची भर पडली. मात्र, निर्देशांकांमधील ही मोठी वाढ पाहून नवख्या गुंतवणूकदारांनी कोणत्याही अभ्यासाशिवाय समभागांमध्ये थेट उडी घेणे धोक्याचे ठरू शकते, असा इशारा विश्लेषकांनी दिला आहे. बाजारातील सध्याची तेजी ही काही निवडक मोठ्या कंपन्यांच्या समभागांवर आधारलेली आहे. व्यापक बाजाराचा विचार करता मिड कॅप आणि स्मॉल कॅप समभागांचे मूल्यांकन अद्यापही ऐतिहासिक सरासरीपेक्षा बरेच चढे आहे. कंपन्यांचे दुसऱ्या तिमाहीचे आर्थिक निकाल संमिश्र येत असून उत्पादन खर्चातील वाढीचा दबाव अनेक क्षेत्रांवर स्पष्टपणे जाणवत आहे. अशा स्थितीत गुंतवणूकदारांनी केवळ रोज वाढणाऱ्या समभागांच्या मागे धावण्याऐवजी भक्कम ताळेबंद, कमी कर्ज आणि सातत्यपूर्ण नफा कमावणाऱ्या लार्ज कॅप कंपन्यांवर आपले लक्ष केंद्रित केले पाहिजे.

दीर्घकालीन संपत्ती निर्मितीसाठी बाजारातील प्रत्येक मोठ्या तेजीच्या सत्रात थोडे नफावसुलीचे धोरण ठेवणे आणि रोख गंगाजळी तयार ठेवणे हिताचे ठरते. आंतरराष्ट्रीय पातळीवरील भू-राजकीय संघर्ष आणि अमेरिकन मध्यवर्ती बँकेचे व्याजदरांविषयीचे धोरण अजूनही अनिश्चित आहे. त्यामुळे बाजारात पुन्हा चढ-उतार निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. गुंतवणूकदारांनी आपल्या एकूण पोर्टफोलिओमधील किमान १५ ते २० टक्के भांडवल सोन्यासारख्या सुरक्षित धातूंमध्ये किंवा चांगल्या रोख्यांमध्ये सुरक्षित ठेवून जोखीम नियंत्रणात ठेवली पाहिजे. एकाच क्षेत्रावर अवलंबून न राहता वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये भांडवलाची विभागणी करणे हीच सध्याच्या अनिश्चित बाजारातील सुरक्षिततेची गुरुकिल्ली मानली जाते.

◆◆◆

गृहकर्जाचा हप्ता तेवढाच; पण व्याजाचा बोजा वाढणार!

गृहकर्ज घेताना बहुतेक ग्राहकांचे लक्ष मासिक हप्त्याकडे असते. दरमहा किती रक्कम भरावी लागणार, यावरून कर्ज परवडेल की नाही हे ठरवले जाते. मात्र, व्याजदरात वाढ झाल्यानंतर मासिक हप्ता बदलला नाही म्हणून कर्जाचा खर्चही कायम राहतो, असे समजणे चुकीचे ठरू शकते.

ऑक्टोबर २०२६ मध्ये रिझर्व्ह बँकेने रेपो दरात ०.२५ टक्क्यांची वाढ करून तो ५.५० टक्क्यांवर नेल्याच्या पार्श्वभूमीवर गृहकर्जदारांसाठी हा मुद्दा महत्त्वाचा झाला आहे. बदलत्या व्याजदराशी जोडलेल्या कर्जांमध्ये बँक मासिक हप्ता वाढवू शकते किंवा काही अटींनुसार कर्जफेडीचा कालावधी वाढवू शकते.

■ १ कोटीच्या कर्जाचे गणित

समजा, एखाद्या व्यक्तीने २५ वर्षांसाठी १ कोटी रुपयांचे गृहकर्ज घेतले आहे. वार्षिक व्याजदर ७.६० टक्के असल्यास मासिक हप्ता अंदाजे ७४ हजार ५५० रुपये येतो. हा व्याजदर पुढील काळात एकूण १ टक्क्याने वाढून ८.६० टक्के झाला आणि कर्जाची बाकी रक्कम व उर्वरित कालावधी समान असल्याचे गृहीत धरले, तर मासिक हप्ता सुमारे ८२ हजार ४५० रुपये होऊ शकतो. म्हणजे महिन्याला जवळपास ७,९०० रुपयांची वाढ.



७५ लाख रुपयांच्या कर्जासाठी याच उदाहरणात मासिक हप्ता सुमारे ५५ हजार ९०० रुपयांवरून ६१ हजार ८०० रुपयांपर्यंत जाऊ शकतो. हे आकडे १ टक्के व्याजवाढीचे काल्पनिक उदाहरण आहेत. ऑक्टोबरमधील ०.२५ टक्के रेपो दरवाढीचा प्रत्येक कर्जावर तितकाच परिणाम होईल, असा त्याचा अर्थ नाही.

■ हप्ता न वाढवण्याचा पर्याय

काही बँका ग्राहकांचा मासिक हप्ता कायम ठेवून कर्जाचा कालावधी वाढवतात. सुरुवातीला हा पर्याय सोयीचा वाटतो. मात्र, कर्ज जास्त काळ चालल्यामुळे एकूण व्याज वाढू शकते.

विशेषतः कर्जाच्या सुरुवातीच्या वर्षांत मासिक हप्त्यातील मोठा भाग व्याजाच्या परतफेडीसाठी जातो. अशा वेळी व्याजदर वाढल्यास मुद्दल कमी होण्याचा वेग आणखी मंदावू शकतो. कर्जदाराने बँकेकडून सुधारित परतफेडीचे वेळापत्रक मागवावे. कर्ज कधी संपणार, किती व्याज द्यावे लागणार आणि हप्ता वाढवल्यास किती बचत होऊ शकते, हे तपासावे.

◆◆◆

निश्चित की बदलता व्याजदर?

काही बँका सुरुवातीच्या ठरावीक कालावधीसाठी निश्चित व्याजदर आणि त्यानंतर बदलता व्याजदर असलेली मिश्र गृहकर्ज योजना देतात. यामुळे सुरुवातीच्या काही वर्षांत हप्त्याबाबत निश्चितता मिळू शकते. मात्र, निश्चित कालावधी संपल्यानंतर बाजारातील व्याजदरांचा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे अशा कर्जांची तुलना करताना सुरुवातीचा दर, पुढील दर निश्चित करण्याची पद्धत आणि शुल्क तपासणे आवश्यक आहे. गृहकर्जदारांनी दरवर्षी किमान एकदा आपल्या कर्जाचा आढावा घ्यावा. आर्थिक क्षमता असल्यास अतिरिक्त मुद्दलफेड करण्याचा पर्यायही तपासता येईल. त्यामुळे भविष्यातील व्याजाचा खर्च कमी करण्यास मदत होऊ शकते.

नियमित पैसे भरूनही थकबाकी का कमी होत नाही?

क्रेडिट कार्डचे बिल भरताना ग्राहकांसमोर दोन पर्याय असतात. संपूर्ण बिल भरणे किंवा किमान देय रक्कम भरणे. पैशांची अडचण असल्यास अनेक जण दुसरा पर्याय निवडतात. मात्र, किमान रक्कम भरल्यामुळे दंडात्मक विलंब शुल्क टाळता आले, तरी उर्वरित थकबाकीवर मोठे व्याज लागू शकते.

एका आर्थिक विश्लेषणानुसार, १ लाख रुपयांच्या क्रेडिट कार्ड थकबाकीवर वर्षभर फक्त किमान रक्कम भरत राहिल्यास ग्राहकाने जवळपास ६९ हजार रुपये भरलेले असूनही मूळ कर्जापैकी सुमारे ७८ हजार रुपये शिल्लक राहू शकतात.

या उदाहरणात क्रेडिट कार्डवर महिन्याला ३.७५ टक्के व्याज गृहीत धरले आहे. हा दर साध्या वार्षिक गणनेनुसार ४५ टक्के होतो. १ लाख रुपयांची सुरुवातीची थकबाकी, नवीन खरेदी नाही आणि प्रत्येक महिन्याच्या किमान देय रकमेत व्याज, जीएसटी व उर्वरित मुद्दलाच्या २ टक्के रकमेचा समावेश, अशी गृहीतके वापरण्यात आली आहेत. या गणितानुसार ग्राहक वर्षभरात सुमारे ६९ हजार १६० रुपये भरतो. त्यापैकी जवळपास ४७ हजार ६३० रुपये व्याज आणि जीएसटीपोटी जातात. मुद्दल मात्र अवघे २१ हजार ५३० रुपयांनी कमी होते. वर्षअखेरीस सुमारे ७८ हजार ४७० रुपयांची थकबाकी कायम राहते. प्रत्यक्ष व्याजदर, किमान देय रकमेची पद्धत आणि व्यवहारांच्या तारखा यानुसार हे आकडे बदलू शकतात.

नवीन खरेदीही महाग पडू शकते

क्रेडिट कार्डचे संपूर्ण बिल वेळेत भरल्यास पात्र खरेदीवर व्याजमुक्त कालावधीचा लाभ मिळतो. मात्र, मागील बिलाची काही रक्कम पुढे ढकलल्यास हा लाभ थांबू शकतो. अशा वेळी नवीन खरेदीवरही व्यवहाराच्या तारखेपासून व्याज आकारले जाण्याची शक्यता असते. उदाहरणार्थ, २० हजार रुपयांची नवीन खरेदी करून ती साधारण महिनाभर थकीत राहिल्यास ३.७५ टक्के मासिक दराने सुमारे ७५० रुपये व्याज लागू शकते. त्यावर जीएसटी वेगळा. त्यामुळे जुनी थकबाकी असताना त्याच कार्डवर नवीन खरेदी करणे खर्चिक ठरू शकते.

कर्जाच्या सापळ्यातून बाहेर कसे पडावे?

सर्वप्रथम क्रेडिट कार्डची संपूर्ण थकबाकी, मासिक व्याजदर आणि परतफेडीसाठी उपलब्ध रक्कम यांचे गणित मांडावे. संपूर्ण रक्कम तातडीने भरता येत नसेल, तर कार्ड कंपनीकडून हप्त्यांचा पर्याय तपासावा. काही परिस्थितीत कमी व्याजदराचे वैयक्तिक कर्ज उपयोगी ठरू शकते. मात्र, प्रक्रिया शुल्क, कर्जाचा कालावधी आणि एकूण व्याज विचारात घेतल्याशिवाय निर्णय घेऊ नये.

किमान देय रक्कम हा तात्पुरत्या अडचणीतील पर्याय आहे. नियमित परतफेडीची कायमस्वरूपी पद्धत म्हणून त्याचा वापर केल्यास कर्जातून बाहेर पडण्यासाठी अनेक वर्षे लागू शकतात.

◆◆◆

नवजात अर्भकाला रस्त्याच्या कडेला फेकून देणाऱ्या तिघांना अटक

पिडीत तरुणीवर अत्याचार करून तिला गर्भवती केल्याचे तपासात निष्पन्न



पिडीत तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याने ती गर्भवती राहून तिने दिलेल्या नवजात बालकाला रस्त्याच्या कडेला बेवारस फेकून देणाऱ्या आरोपींना पकडल्या नंतर त्यांच्या समवेत भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे पथक.

नगर – नगर तालुक्यातील बाराबाभळी बायपास परिसरात काही दिवसांपूर्वी एका बाभळीच्या झाडाखाली नवजात अर्भकाला फेकून देणाऱ्या ३ आरोपींना भिंगार कॅम्प पोलिसांनी पकडले आहे. पीडित तरुणीवर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार करून तिला गर्भवती केल्याचे व जन्माला आलेले नवजात बालक बेवारस अवस्थेत फेकून दिल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ८ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.४५ वाजण्याच्या सुमारास बाराबाभळी शिवारातील बायपास रस्त्यालगत एका बाभळीच्या झाडाखाली अंदाजे १ ते २ दिवसांचे नवजात पुरुष जातीचे अर्भक बेवारस अवस्थेत आढळून आले होते. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनमध्ये भारतीय न्याय संहिता कलम ६४(१), ६४(२) (एम), ३(५) अन्वये गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी या घटनेचा तातडीने सखोल तपास सुरू केला असता, पीडित तरुणीवर आरोपीने जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केल्याचे उघडकीस आले. तसेच नवजात बालकाला रस्त्याच्या कडेला फेकून देण्याच्या या गुन्ह्यात अन्य लोकांचाही सहभाग असल्याचे समोर आले.

याप्रकरणी पोलिसांनी कारवाई करत किरण विश्वनाथ वाघमारे (वय २४), वैशाली राजेंद्र भिंगारदिवे (वय ३६) आणि इरफान मिकन शेख (वय ५१) या तीन आरोपींना अटक केली आहे. तपासादरम्यान मुख्य आरोपी किरण वाघमारे याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून, पीडित तरुणी व नवजात बालकाचे डीएनए नमुने घेऊन पुढील तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. तसेच नवजात बालकाला रस्त्याच्या कडेला नेऊन टाकण्यासाठी वापरण्यात आलेली मोटारसायकल पोलिसांनी जप्त केली आहे.

गुन्ह्यातील इतर पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे. सदर कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनच्या स.पो.नि. तेजश्री थोरात, पोलीस उपनिरीक्षक योगेश पवार, सुहास आव्हाड, पोलीस हेड कॉन्स्टेबल रवी टकले, दिलीप शिंदे, कैलास सायंबर, रेखा पुंड, रामनाथ डोळे, प्रमोद लहारे, कांतीलाल चव्हाण, सतीश भांड तसेच दक्षिण मोबाईल सेलचे अरुण सांगळे यांच्या पथकाने केली आहे.



गुरुवाणी – ११२

शरीर व आत्मा..



राजा प्रदेशीची ठाम धारणा असते की, शरीर व आत्मा वेगवेगळे नाहीत. दोन्ही एकच आहेत. मी हवाबंद लोखंडी संदूकात जिवंत माणूस बंदिस्त केला. काही दिवसांनी तो माणूस मृत झाला. त्याच्या शरीराला किडे लागले होते. इतके किडे आतमध्ये आले कसे? संदूकात तर कुठेहीट छेद झाला नाही, आत्मा गेली कुठे? आणि किडे कसे आले? केशी श्रमण यावर उत्तर देतात, एका गुफेचे दरवाजे बंद केले तरीही आतून थोडासाच आवाज येतोच. आत्माही तशीच असते ती बाहेर पडतेच कारण आत्मा सूक्ष्म आहे, स्थूल वस्तू नाही. राजा प्रदेशी म्हणतो, मी आणखी एक प्रयोग केला. माझा एक सैनिक म्हातारा झाला, तेव्हा तो पूर्वी इतके वजन उचलू शकत नव्हता. त्याचे शरीर वृद्ध झाले मग तुमच्या सांगण्यानुसार आत्मा वृद्ध का झाला नाही ? केशी श्रमण म्हणतात, एखादा बलशाली व्यक्ती बलशाली धनुष्य असेल तरच बाण निशाण्यावर मारू शकतो. पण धनुष्यच जर कमजोर असेल तर बलशाली व्यक्तीही काही करू शकत नाही. तसेच शरीरासाठी आत्मा हे धनुष्य आहे. मग राजा प्रदेशी म्हणतो, आत्मा आहे तर मग ती दिसत का नाही? केशी श्रमण म्हणतात, हवा तुला दिसत नाही, पण जाणवते. तुम्हाला जे डोळ्यांनी दिसत नाही याचा अर्थ ते अस्तित्वात नाही. राजा प्रदेशी म्हणतो, मी जिवंत व मृत व्यक्तीचे वजन पाहिले, ते सारखेच होते, मग आत्म्याचे वजन कुठे गेले? केशी श्रमण म्हणतात, सूर्य किरणांचा प्रकाश सगळीकडे असतो पण त्याला वजन नसते. जरूरी नाही की प्रत्येक वस्तूला वजन असलेच पाहिजे. प्रदीर्घ चर्चे नंतर राजा प्रदेशीला सगळे मान्य होते. तो म्हणतो , माझ्यात बदल झाला आहे, आता मी सगळ्यांना घेऊन येथे परत येईल मग सगळ्यांसमोर मी वंदना करेल. कारण माझ्यातील परिवर्तन माझ्या एकट्या पुरते मर्यादित नाही राहिले पाहिजे. दुसऱ्या दिवशी राजा प्रदेशी सर्वांसमवेत धर्म स्विकारतो. जेव्हा घरातील कोणी सुधारतो तेव्हा तुम्हाला आनंद झाला पाहिजे. पण राजा प्रदेशी सुधारला आणि काहींना दुःख झाले. प्रत्येकाच्या आयुष्यात असे जीव असतात. विचार करा, आपण आपल्या जवळच्या लोकांचें हित खरच इच्छितो का? राजा प्रदेशी सुधारला पण अनेक जण दुःखी झाले. सगळ्यात जास्त दुःखी झाली त्याची राणी. तिला वाटले आता नवरा माझ्या काही कामाचा नाही राहिला.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

बस स्थानकात तसेच प्रवासात प्रवाशांच्या पर्स चोरणारी महिलांची कुख्यात टोळी अखेर जेरबंद

३ गुन्ह्यांची उकल, ६.११ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी केला हस्तगत



नगर – बस स्थानकात झालेल्या गर्दीचा फायदा घेत तसेच बस प्रवासादरम्यान महिलांच्या पर्समधून सोन्याचे दागिने, रोकड चोरणारी आंतरजिल्हा महिला चोरांची टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केली आहे. या टोळीकडून ३ गुन्हे उघडकीस आले असून त्यांच्या कडून ६ लाख ११ हजार रुपये किंमतीचे ४७ ग्रॅम सोने जप्त करण्यात आले आहे.

याबाबतची माहिती अशी की फिर्यादी महिला ही २४ जुलै २०२६ रोजी स्वस्तिक चौकातील पुणे बसस्थानक येथे बस मध्ये बसत असताना अज्ञात महिला चोरांनी त्यांच्या पर्समधून ३ लाख ६० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लांबवले होते. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विकास जाधव व पोलीस अंमलदार निळकंठ कारखेले, विकास साळवे, भगवान सानप, बाळासाहेब खेडकर, संतिष भवर, प्रशांत राठोड, महिला पोलीस अंमलदार भाग्यश्री भिटे, किरण ठुबे यांचे पथक तपास करत होते.

पथकाने तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे दिनांक १४ नोव्हेंबर रोजी शिल्पा प्रशांत चव्हाण (वय २२, रा. निपाणी वडगाव, ता. पाथर्डी) हिस माळीवाडा बसस्टँड येथून ताब्यात घेतले. तिची कसून चौकशी केली असता तिने दिपाली उर्फ गुटी निखील चव्हाण (रा.शेवगाव रोड, पाथर्डी), कारली पाल्या चव्हाण (रा.कोरडगाव ता.पाथर्डी), कोमल नागनाथ काळे (रा.पाथर्डी रोड, शेवगाव), यासमिन ठाकुर भोसले (रा.भानसहिवरा ता.नेवासा) या आपल्या इतर साथीदारांच्या मदतीने हे गुन्हे केल्याची कबुली दिली. या सर्व आरोपी फरार आहेत. पथकाने तपासादरम्यान आरोपींकडून एकूण ६ लाख ११ हजार रुपये किमतीचे ४७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत. या टोळीतील इतर फरार महिलांचा पोलीस कसून शोध घेत आहेत. ताब्यातील आरोपीस मुद्देमालासह कोतवाली पोलीस स्टेशन येथे हजर केले असून, गुन्हयाचा पुढील तपास कोतवाली पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

गुरुवाणी – ११३

आस्थेची शक्ती..



राजा प्रदेशीने केशी श्रमण यांना विचारले, इतक्या लोकांसमोर तुम्ही माझा अपमान करत आहात? मला मूर्ख म्हणता, हे आपल्याला शोभा देते का? त्यावर केशी श्रमण म्हणतात, अनेक प्रकारच्या व्यवस्था, प्रोटोकॉल असतात. क्षत्रिय, गाथापती, श्रमण अणि ब्राह्मण यांच्या संघांचा प्रोटोकॉल असतो. तो प्रोटोकॉल तोडला तर शिक्षा होतेच. तू असाच प्रोटोकॉल तोडला. तू प्रोटोकॉल का तोडला? राजा प्रदेशी म्हणतो, मी तुम्हाला पाहिले तेव्हाच मला परिवर्तन जाणवले होते.फक्त तुमच्या कडून जास्तीत जास्त ज्ञान मिळवण्यासाठी मी वाकडे तिकडे प्रश्न विचारले. मला माहिती होते, हे झाड खूप फळ देणारे आहे. त्यासाठी जास्तीत जास्त ओरबडण्याचा प्रयत्न केला. राजा प्रदेशी सुधारेल अशी शक्यता कोणालाच वाटत न्हवती. पण केशी श्रमण यांना आपल्या ज्ञानाच्या जोरावर आपण राजाला सुधारू शकतो हा विश्वास होता. या सर्व गोष्टीला एकमेव व्यक्ती कारणीभूत होती ती म्हणजे चित्र सारथी त्याने मित्र म्हणजे काय हे दाखवून दिले. तुम्ही सुद्धा कोणाच्या आयुष्यात चित्र सारथी बना, त्याच्या सारखाच मित्र बनवा. राजा प्रदेशी दुष्ट आहे पण 'भवी' म्हणजे सुधारण्याची संभवना असलेला आहे. 'अभवी' मध्ये सुधारण्याची संभवना नसते. म्हणून देव लोकातील देव सुद्धा जेव्हा तीर्थंकरांकडे येतात तेव्हा त्यांना विचारतात मी भवी आहे की अभवी ? कारण तेच एकमेव तीर्थंकर याचे उत्तर देण्यास समर्थ असतात. समजवले, समज आली तरीही प्रॅक्टिकली नाही सुधरले तर उपयोग नाही. मी आज काय आहे हे महत्त्वाचे नाही. मी कोणत्या दिशेने पाऊल टाकतोय हे महत्त्वाचे आहे. नगरमधील या समर्पण चातुर्मासाचे खरे श्रेय गुरूदेवांच्या जन्मोत्सवात तपस्या करणाऱ्यांना आहे. अनेक तपस्वींनी याआधी जीवनात कधी तपस्या केली नव्हती. काही जणांना बीपी, शुगर होती. तरीही त्यांनी श्रद्धेने अट्ठाई उपवास केले. काहींनी जन्माने जैन नसतानाही तपस्या केली. चेन्नईतील कुष्ठरोगींनीही तपस्या केली. या सर्व तपस्वींप्रती कृतज्ञता व्यक्त करतो. गुरूदेवांचा जन्मोत्सव संपूर्ण जगात अद्भुत आहे कारण अट्ठाई करणाऱ्या तपस्वींमुळे. एकाही तपस्वीने कसलीही तक्रार केली नाही. ही गुरूदेवांवरील श्रद्धा आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांश व्यक्तींनी गुरूदेवांना कधी पाहिलेही नाही. तरीही त्यांनी आराध्य गुरूदेवांसाठी तपस्या केली. त्यांचे गुरूदेवांशी पूर्व जन्मीचे नाते नक्की असणार. अनेक जण व्याधीग्रस्त होते पण त्यांनी आस्थेने तपस्या करून आपल्या आराध्याची शक्ती ग्रहण केली.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

रात्रीच्या वेळी २ ठिकाणी घरे फोडून लाखोंचा ऐवज चोरट्यांनी पळविला

सोन्या – चांदीचे दागिन्यांसह रोख रकमेचा समावेश, गुन्हा दाखल

नगर – नगर तालुक्यातील इमामपूर येथे रात्रीच्या वेळी दोन घरे फोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्या – चांदीचे दागिन्यांसह रोख रक्कम असा लाखोंचा ऐवज चोरून नेल्याची घटना १४ नोव्हेंबर रोजी रात्री १० वाजल्यापासून १५ नोव्हेंबर रोजी पहाटे २.०७ वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत रविंद्र दामोधर टिमकरे (वय ३३, रा. इमामपूर, ता.नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे बंधू भरत दामोधर टिमकरे यांचे घर बंद होते. रात्रीच्या वेळी त्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला. घरात सर्वत्र उचकापाचक करत घरातील कपाटात ठेवलेले १ लाख १६ हजार २०० रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने, चांदीची साखळी व रोख रक्कम चोरट्यांनी लांबवली.

तसेच शेजारी राहणाऱ्या सीताराम लक्ष्मण टिमकरे यांच्या पर्स मधील रोख रक्कम देखील अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली. या प्रकरणी रविंद्र दामोदर टिमकरे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात घटनेची माहिती दिली. ही माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे स.पो.नि. हेमंत थोरात, पो. हे.कॉ. राजू सुद्रिक यांच्या सह पथकाने घटनास्थळी भेट देत पाहणी केली. श्वानपथकाच्या सहाय्याने चोरट्यांचा माग काढण्याचा प्रयत्न केला.

या प्रकरणी रवींद्र टिमकरे यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०५(अ), ३३१(२), ३३१(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस पो.हे.कॉ. राजू सुद्रिक हे करत आहेत.

फुले दाम्पत्यांच्या स्मारकासाठी बेमुदत उपोषणाला प्रारंभ



नगर – माळीवाडा वेस येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांची उभारणी करण्यासाठी भूमिपूजन होऊन तब्बल एक वर्ष तीन महिन्यांचा कालावधी उलटला, तरी प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. महापालिका प्रशासनाच्या या दिरंगाईविरोधात अखेर फुलेप्रेमी आणि माळी समाजातील विविध संघटनांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

पुतळे उभारणीच्या कामाला तातडीने सुरुवात करावी आणि माळीवाडा वेस व परिसरातील बेकायदेशीर अतिक्रमणे हटवावीत, या मागणीसाठी १६ नोव्हेंबर रोजी माळीवाडा वेशीवरील महात्मा फुले यांच्या पुतळ्यासमोर क्रांतीज्योती सावित्रीबाई महात्मा ज्योतिबा फुले कृती समिती आणि अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेच्या वतीने बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात आले.

या उपोषणात कृती समितीचे अध्यक्ष प्रा. माणिक विधाते, सकल माळी समाज संस्थेचे अध्यक्ष किशोर डागवाले, माजी महापौर भगवान फुलसौंदर, उपमहापौर अनिल बोरुडे, नगरसेवक निखिल वारे, बाजार समिती संचालक संतोष म्हस्के, कृती समितीचे सचिव अशोक कानडे, पंडितराव खरपुडे, ज्ञानेश्वर रासकर, बजरंग भुतारे, चर्मकार विकास संघ महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष संजय खामकर, माळी महासंघाचे राज्य पदाधिकारी सरपंच राम पानमळकर, नगरसेवक अविनाश घूले, निखिल वारे, प्रकाश भागानगरे,संतोष गेनाप्पा, बाली बांगरे, महेश तवले, नगरसेविका सुनिताताई फुलसौंदर, अमोल गाडे, बाळासाहेब पवार, नगरसेवक दत्ता गाडळकर, गणेश कवडे, माजी नगरसेवक अर्जुनराव बोरुडे, गोरख पडोळे, जालिंदर कोतकर, नगरसेविका आशाताई, सुजाता पडोळे, मंगल बोरुडे, मनोज ताठे, सकल माळी समाजाचे संजय गारुडकर, सचिव अमोल भांबरकर, अनिल इवळे, कोअर कमिटी सदस्य राजेंद्र ताठे, विष्णुपंत म्हस्के, मुकुंद देवगावकर, अशोक बाबर, चंद्रकांत फुलारी, समता परिषदेचे राज्य पदाधिकारी अंबादास गारुडकर, बारा बलुतेदार महासंघाचे अध्यक्ष माऊली मामा गायकवाड, सारस ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रकाश इवळे, माजी पंचायत समिती सदस्य देवा होले, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष ब्रिजेश ताठे, माजी नगरसेवक सुरेश तात्या आंबेकर, संतोष हजारे, शिवम भंडारी, सांगळे, प्रकाश शिंदे, आनंद पुंड, चंद्रकांत पुंड, मच्छिंद्र फुलसौंदर, मच्छिंद्र बनकर, माळी महासंघाचे अध्यक्ष भुषण भुजबळ, उपाध्यक्ष मनोज भुजबळ, मनोज फुलसौंदर, नंदकुमार नेमाने, संजय ताजणे, रमेश चिपाडे, राजाराम चिपाडे, सुरेश जाधव, विनायक कोके, आकाश डागवाले, सुरेश खरपुडे, कल्याण रोड ज्येष्ठ नागरिक संघाचे प्रा. भगवान काटे, दीपक खेडकर, संभाजी चौधरी, दिनेश कापरे, दामोदर कळमकर, डॉ. भगवान हजारे, शामराव व्यवहारे, शिववरद महिला मंडळाच्या अध्यक्ष आरती आढाव, रुपाली गणगले, शिल्पा गणगले, रेणुका पुंड, रोहिणी बनकर आदी सहभागी झाले होते.

आजपर्यंत कामाचा श्रीगणेशाच नाही

माळीवाडा वेशीवर फुले दाम्पत्यांचे भव्य पूर्णाकृती पुतळे उभारण्याच्या कामाचे भूमिपूजन २७ जुलै २०२५ रोजी करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या हस्ते, तसेच अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते आणि आमदार संग्राम जगताप यांच्यासह इतर अनेकांच्या उपस्थितीत हा भूमिपूजन सोहळा पार पडला होता. या भूमिपूजनामुळे शहरातील फुलेप्रेमी आणि माळी समाजामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, भूमिपूजनानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल, अशी अपेक्षा असतानाही आजपर्यंत कामाचा श्रीगणेशा झालेला नाही.

प्रशासनाकडे वारंवार केला पाठपुरावा

या संदर्भात महापालिका प्रशासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला. मात्र, वारंवार मागणी करूनही प्रशासनाकडून त्याची गांभीर्याने दखल घेतली गेली नसल्याचा आरोप कृती समिती आणि सकल माळी समाज संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. त्यामुळे केवळ निवेदने देऊन आणि पाठपुरावा करून प्रश्न सुटणार नसल्याने अखेर बेमुदत आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले.

अतिक्रमणांचा अडथळा हटवूनही कामाला विलंब

माळीवाडा वेस येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले यांचे भव्य पूर्णाकृती पुतळे उभारण्याचे नियोजन आहे. मात्र, या कामामध्ये परिसरातील अतिक्रमणांचा अडथळा निर्माण होत असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे माळीवाडा वेस आणि परिसरातील सर्व बेकायदेशीर अतिक्रमणे तातडीने हटवून पुतळे उभारणीच्या कामातील अडथळे दूर करावेत, तसेच प्रत्यक्ष कामाला विलंब न करता सुरुवात करावी, अशी मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे.

ठोस आश्वासनाशिवाय उपोषण मागे नाही

शहरात फुले दाम्पत्यांचे भव्य स्मारक उभे राहणे ही केवळ एका समाजाची मागणी नसून शिक्षण, समता आणि सामाजिक परिवर्तनाचा विचार पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन अतिक्रमणे हटवावीत आणि पुतळे उभारणीच्या कामाला तातडीने गती द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. प्रशासनाकडून ठोस आणि विश्वासार्ह आश्वासन मिळाल्याशिवाय उपोषण मागे घेतले जाणार नाही, असे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे उपायुक्तांची मध्यस्थी निष्फळ ठरली असून, फुले दाम्पत्यांच्या पुतळे उभारणीच्या मागणीसाठी सुरू करण्यात आलेले बेमुदत आमरण उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्धार कृती समिती आणि सकल माळी समाज संस्थेने व्यक्त केला आहे.

विविध संघटनांचा आंदोलनाला जाहीर पाठिंबा

माळीवाडा वेशीवर सुरू करण्यात आलेल्या आमरण उपोषणाला शहरातील विविध सामाजिक, राजकीय आणि समाजसेवी संघटनांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. यामध्ये ओबीसी व्हिजेएनटी, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, हमाल पंचायत संघटना,विरशैव लिंगायत गवळी समाज, चर्मकार विकास संघ महाराष्ट्र राज्य, माळी महासंघ अहिल्यानगर, महाराष्ट्र प्रदेश बारा बलुतेदार महासंघ अहिल्यानगर जिल्हा, जय भगवान महासंघ, सारस ज्येष्ठ नागरिक संघ, सकल ओबीसी भटके विमुक्त यलगार मेळावा, नामदेव विठ्ठल मंदिर शिंपी समाज, जय हिंद फाउंडेशन अहिल्यानगर, फुले ब्रिगेड, हर दिन मॉर्निंग ग्रुप भिंगार, क्रांतीसुर्य बहुउद्देशीय प्रतिष्ठान आदी संघटनांचा समावेश आहे. या सर्व संघटनांनी आंदोलनाला पाठिंबा देणारी पत्रे कृती समितीकडे सुपूर्द केली आहेत.

उपायुक्तांची मध्यस्थी निष्फळ; उपोषण सुरूच

दरम्यान, महापालिकेचे उपायुक्त हरीनारायण येलगट्टे आणि अतिक्रमण विभागाचे सुरेश इथापे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. पुतळे उभारणीच्या कामाला सुरुवात करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी द्यावा, अशी विनंती करीत त्यांनी काम सुरू करण्याचे आश्वासन दिले. मात्र, यापूर्वीही प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने केवळ तोंडी आश्वासनावर विश्वास ठेवता येणार नसल्याची भूमिका उपोषणकर्त्यांनी घेतली.

केस मागे घेण्यास नकार दिल्याने तरुणाला बेदम मारहाण

नगर – न्यायालयात दिलेली केस मागे घेण्यास नकार दिल्याने एका चारचाकी वाहन चालक असलेल्या तरुणाला दोघांनी स्टिलची टॉमी व धारदार वस्तूने बेदम मारहाण केल्याची घटना १५ नोव्हेंबर रोजी दुपारी १२.३० च्या सुमारास नगर सोलापूर रोडवर एस.एम. विल्यम बूथ शाळेजवळ घडली.

याबाबत आकाश बाळू भवाळ (वय ३६, रा. हरिमळा, नगर–सोलापूर रोड, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे नगर–सोलापूर रोडने जात असताना एस.एम. विल्यम बूथ शाळेजवळ, शांतिनगर येथे पाठीमागून आरोपी महेश दादा भवाळ आणि स्वप्नील दादा भवाळ (दोघे रा. धालवडी कुळधरण, ता. कर्जत) हे आले. त्यांनी फिर्यादी यांच्याजवळ येऊन तुम्ही आमच्याविरुद्ध न्यायालयात दिलेली केस मागे घ्या, अशी धमकी दिली.

फिर्यादीने न्यायालयात सुरू असलेली केस मागे घेण्यास स्पष्ट शब्दात नकार दिला. याचा राग आल्याने आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करत दमदाटी केली व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या हल्ल्यादरम्यान आरोपी महेश भवाळ याने त्याच्याकडील स्टिलच्या टॉमीने फिर्यादीच्या डाव्या हातावर व पायावर वार केले.तसेच दुसऱ्या आरोपीने त्याच्या हातातील धारदार वस्तूच्या उलट्या बाजूने फिर्यादीच्या डोक्यात मारून गंभीर जखमी केले.

या मारहाणीच्या झटापटीत फिर्यादीचा मोबाईल फोन सुद्धा तुटून नुकसान झाले आहे. याबाबतच्या फिर्यादी वरून पोलिसांनी दोघा आरोपींच्या विरुद्ध गंभीर दुखापत केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या ८ गोवंशीय जनावरांची सुटका

नगर – नेवासा तालुक्यातील चांदा गावामध्ये अयनाज मोबीन शेख याने त्याच्या साथीदारांसह कत्तलीसाठी शेडच्या आडोशाला आणि काटवनात डांबून ठेवलेल्या १लाख १५ हजार रुपये किमतीच्या ८ गोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुटका केली आहे.

याप्रकरणी आरोपी अयनाज मोबीन शेख, आशकान अमिन शेख, नबाब गुलाब शेख (सर्व रा.चांदा,ता.नेवासा) यांच्याविरुद्ध सोनई पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे सर्व आरोपी फरार असून त्यांचा पोलिसांकडून शोध सुरू आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे,सहायक पोलीस निरीक्षक हरिष भोये, पोलीस अंमलदार अरूण गांगुर्डे, बाळासाहेब नागरगोजे, अशोक लिपणे, शामसुंदर जाधव, मनोज साखरे, अमोल कोतकर व किशोर शिरसाठ यांनी केली आहे.

1BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे

विवेकानंद चौक, शनिमंदिराजवळ, अहिल्यानगर (शाकाहारी कुटुंबासाठी)

9356150070

भाड्याणे देणे आहे

बालिका अश्रमरोड महालक्ष्मी उद्यान समोर असलेले १२ X १५ फुटाचे २ गाळे किंव्हा दोन्ही मिळुन एकच गाळा ,डॉ. क्लिनीक, बँक,पतसंस्था, ऑफिस, गोडाऊन,कॅफे, हॉटेल इ.साठी भाड्याणे देणे आहे

संपर्क 9975672401

भाड्याने देणे

एम जी रोड, प्राईम लोकेशनवर ३ मजली दुकान भाड्याने देणे आहे.

9588412500

चाहिए

अहिल्यानगर शहर और एमआयडीसी के लिए सिक्युरिटी गार्ड व हाऊस किंपीग चाहिए (महिला/पुरुष)

6386633129
7020839133

पाहिजेत

सिक्युरीटी गार्ड

8788365654

पाहिजेत

अकौंटंट
१ जागा
टॅली अनुभव आवश्यक

सुमित सल्स
संपर्क -9518310300
राम मंदिरामागे, दाळमंडई, अ. नगर

सावेडी येथील नामांकित शोरुमसाठी त्वरित पाहिजेत

सेल्समन/सेल्सगर्ल - १०
१ ते २ वर्षांचा अनुभव

कॅशिअर-०४
(आकर्षक पगार) -अर्जासाठ समक्ष भेटा -

Franchise by - DB VENTURES One Stop Shop
SONY GIFTS PVT. LTD.
Address : Opp. Gold's Gym, TV Center, Savedi Road, A.Nagar

7887395983

ड्रायव्हर पाहिजे

पुणे एस टी स्टँण्डजवळ आसपास राहणाऱ्या सेवानिवृत्त (Retired) मानसाजवळ, घरगुती, बँक कामे व क्लीनिकल इ. कामे करणारा

वाहनचालक
(Driver)

कामाची वेळ : स. १० ते २ व संध्याकाळी ४ ते ६ पर्यंत

9422221276

जार फिल्टर मशिन भाड्याने देणे किंवा विकणे व छोटा हत्ती गाडी शिप ने देणे आहे.

संपर्क : 9270707042

व्यावसायिक जागा भाड्याने देणे

व्यावसायिक वापरासाठी ३ मजली इमारत भाड्याने देणे आहे.

जागेची वैशिष्ट्ये

* एकूण ३ मजली इमारत
* तळमजला – १४०० चौ. फूट
* पहिला व दुसरा मजला – तुलनेने लहान क्षेत्रफळाचे
* विविध व्यावसायिक वापरासाठी योग्य
* संपूर्ण इमारत भाड्याने उपलब्ध

सराफ बाजार, मालू पेंट्सच्या शेजारी, गंज बाजार, अहिल्यानगर.

इच्छुक व्यावसायिकांनी जागेची पाहणी करण्यासाठी व अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.

9112722711 / 8208727739

गाळा भाड्याणे देणे आहे

स्वस्तिक चौक गणेशवाडी येथील कल्पना पॅलेसमधील २३० स्क्वेअर फुटाचा गाळा व बस स्टॉण्डपासुन जवळ स्वस्तीक चौकातील (३५२ स्क्वे.फूट) १६ X २२ ग्राऊंड फ्लोअरची जागा गोडाऊनसाठी भाड्याणे देणे आहे

संपर्क :-
9890027068

हेल्पर (जेन्टस) २

१० वी वयमर्यादा १८वर्षा पुढील

पाहिजेत

Msc Biology/ Microbiology
(जागा -०१)

Bsc Nursing
(जागा -०२)

पंडित हॉस्पिटल
कोठी रोड, अहिल्यानगर

8847731240
8446676464

पाहिजेत

माळीवाडा परिसरातील दवाखान्यात काम करण्यासाठी Female-2 (असिस्टंट व रिसेप्शनिस्ट)

Male -1 (car driving येत असल्यास प्राधान्य)

8390907414

पाहिजेत

हेल्पर कामगार : २ जागा

दुकानातील काम व वॉचमनसाठी : १ जागा जोडी (नवरा-बायको)

माल वाहतूक टेम्पो ड्रायव्हर : १ जागा

इच्छुकांनी संपर्क साधावा.
अभय सेल्स कॉर्पोरेशन
सातभाई मळा, दिल्लीगेट, अहिल्यानगर
9822542011

पाहिजेत

दिपक एजन्सी/रेडिमेड्स, केडगाव, अहिल्यानगर येथे ॲप डेव्हलपमेंट क्षेत्रात काम करण्यासाठी पूर्णवेळ उमेदवार पाहिजे आहेत.

9356463500

पाहिजेत

डिलीव्हरी बॉय (३ जागा)

ऑफिस वर्कसाठी मुली (२ जागा)

9657058444

ड्रायव्हर पाहिजे

जितो गाडीसाठी लायसन्स धारक, निर्व्यसनी अनुभवी MIDC येथे ड्रायव्हर पाहिजे
वयोमर्यादा ३० वर्षा पर्यंत

7620881810

पाहिजेत

सिव्हिल इंजिनिअर (DCE/B.E) (अनुभवी/फ्रेशर)

नवले बिल्डर्स
गुरुपद्मा अपार्टमेंटस् गुजरलेन, अहिल्यानगर

9326221864

डीटीपी ऑपरेटर पाहिजे

कोरल-ड्रॉ, पेजमेकर, फोटोशॉप, इनडिझाईनच्या कामाचा अनुभव असलेले कॉम्प्युटरसाठी डिटीपी ऑपरेटर पाहिजे

भेटा - वेळ सायं.५ ते ८
दैनिक नवा मराठा कार्यालय
कै. आचार्य गुंदेचा चौक, गंज बाजार, अ.नगर

पाहिजेत

नामांकित कंपनी विगेन इंडिया ऑफिसमध्ये लेक्चर व कम्युनिकेशनसाठी

मुली पाहिजेत
शिक्षण : १२ वी व पदवीधर
पगार ८००० ते १०,०००/-
स्थळ: माळीवाडा, बस स्टँडसमोर, अहिल्यानगर

9503541431

त्वरित जागा भरणे

* आर. एम. ओ. - २ (सिनिअर Rmo)
* फार्मसिस्ट- - ३ जागा
* फिजिओथेरपिस्ट - १ जागा
* नाईट सुपरवायझर - १ जागा
* ओटी. असिस्टंट - २ जागा
* पी आर ओ. - १ जागा
* अकौंटंट - १ जागा

उमेदवारांनी आपल्या बायोडाटा सह प्रत्यक्ष भेटावे. मंगळवार दि.१८/११/२०२६ सायं. ५.३०. (अनुभवी असल्यास प्राधान्य)

न्युरॉन प्लस हॉस्पिटल, सावेडी, अहिल्यानगर.
8459698717, 7378318772





जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर तोंडी ठरविलेला आहे. सदर मिळकतीबाबत विद्यमान मालकांची मालकी, कब्जा व टायटलची खात्री करणेकामी प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिध्द केलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **१० दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता.१६/११/२०२६.

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, मौजे शहर अहिल्यानगर येथील किंग्स गेट रोड भागातील खालील वर्णनाची जागेसह बांधकाम केलेली मिळकत –

अ) सिटी सर्व्हे नंबर १७१८ चे एकुण क्षेत्रफळ १७२.२० चौ.मीटर
यांसी चतुःसिमा
पुर्वेस :- वाग व गल्ली
दक्षिणेस :- सिटी सर्व्हे नं.१७१७/१
पश्चिमेस :- सिटी सर्व्हे नं.७०६८ व किंग्स गेट रोड
उत्तरेस :- सिटी सर्व्हे नं.१७१९/अ व १७१९/ब

ब) सिटी सर्व्हे नंबर सिटी सर्व्हे नं.१७१९/अ चे एकुण क्षेत्रफळ १०६.२० चौ.मीटर
यांसी चतुःसिमा
पुर्वेस :- सिटी सर्व्हे नं. १७१९/ब
दक्षिणेस:- सिटी सर्व्हे नं.१७१८
पश्चिमेस :- किंग्स गेट रोड
उत्तरेस :- सिटी सर्व्हे नं.१७२०

क) सिटी सर्व्हे नंबर सिटी सर्व्हे नं.१७१९/ब चे एकुण क्षेत्रफळ १२०.४० चौ.मीटर
यांसी चतुःसिमा
पुर्वेस :- वाग व गल्ली दक्षिणेस:- सिटी सर्व्हे नं.१७१८
पश्चिमेस :- सिटी सर्व्हे नं.१७१९/अ
उत्तरेस :- सिटी सर्व्हे नं.१७२०

वर कलम अ), ब) व क) मधील नमूद संपूर्ण जागा व त्यावरील संपुर्ण बांधकाम त्यामधील तदंगभूत वस्तुंसह काही एक राखुन न ठेवीता दरोबस्त संपुर्ण मिळकत.

वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक – विजयकुमार नारायणराव देशपांडे,
रा. सावेडी, अहिल्यानगर.

ॲड. समीर वखारे
पत्ता :- ऑफीस नं.५, चंद्रिका मजला, राई ऑर्गेनर बिल्डींग, भिताळे रोड, अहिल्यानगर. मो. नं. ९७९९८८९९९, ९८६८८७५५५९

जाहीर नोटीस

तमाम लोकांस आमचे आशिल यांनी दिलेल्या माहितीवरून व विनंतीवरून या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक **श्री. जयंतीलाल मोटमल ओसवाल रा. माळीवाडा, ता. जि. अहिल्यानगर** यांनी सदरहू मिळकत आमच्या आशिलास कायमखुष खरेदी देण्याचे ठरविले आहे. व त्याप्रमाणे त्यांनी आमचे आशिलास सदरहू मिळकत पुर्णपणे त्यांना विकण्याचा अधिकार असून ती पुर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याबद्दल आमच्या आशिलास विश्वास व हमी दिली आहे. या उपरोक्त सदरहू मिळकतीवर कोणाचेही कुठल्याही प्रकारे काही एक साठेखत, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस जामिन अन्नवस्त्र पोटगी, लिज, अदलाबदल, जनरल मुखत्यार, कौटुंबिक अदलाबदल, वाटप, वाटपाबद्दल वाद वगैरे किंवा कुठल्याही बँक सोसायटी, कोर्ट यांचा दावा. अगर बोजा नोटी, क्लेम, मनाई, जप्ती वगैरे, हक्क अधिकार हितसंबंध असल्यास त्यांनीही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **७ दिवसाच्या** आत आम्हाला वरिल पत्त्यावर लेखी पुराव्यानिशी कळवावे, अन्यथा सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध निजोखमी असल्याचे समजून आम चे आशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मग कोणाचेही कुठल्याही प्रकारे काहीएक तक्रार, हरकत विचारात घेतली जाणार नाही, आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही, म्हणून मुद्दाम ही नोटीस दिली असे

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन
मिळकतीचे वर्णन

मौजे शहर नगर ता. जि. पो. तु. म. न.पा अहमदनगर हद्दीतील सिटी सर्व्हे नं. ४३८१ चा म्यु घर नं. ४८४६ चे क्षेत्र ६१ चौ. मी. खन व टि अँगलमध्ये विकसीत केलेली गावठाण हद्दीतील दुमजली घरजागा मिळकत यामध्ये चारही बाजुच्या भिंती स्वतंत्र आहे.

यांसी चतुःसिमा
पुर्वेस– सि.स.नं. ४३८०
दक्षिणेस– बोळ, रस्ता
पश्चिमेस– सि. स. नं. ४३८२
उत्तरेस– वाग, राजरस्ता

येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक व तदंगभुत वस्तुसह जाणे येणे हक्क मालकी कब्जा, वागवहीवाटीसह तसेच वहितीच्या अधिकारासह आणि प्रत्यक्ष मालकी कब्जासह असलेली निर्जोखमी, निर्वेध असलेली मिळकत.

येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक तदंगभुत वस्तुसह जाणे येणे हक्क मालकी कब्जा वागवहिवाटीसह तसेच भविष्यातील सर्व लाभ अधिकारासह असलेली मिळकत.

नोटीस दिली असे. दि. १६/११/२०२६

ॲड. विजय बी. मुनोत (नोटरी पब्लिक, भारत सरकार)
बी.कॉम.,डी.टी.एल.,एलएलबी, जी.डी.सी ॲण्ड ए.
ॲडव्होकेट ॲण्ड टॅक्स कन्सलटंट
बारातोटी कारंजा, माळीवाडा, अहिल्यानगर,
फोन-(०२४१)२३४६८९७ मो-९८५०८३१५१३



जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेला प्लॉट विद्यमान मालक **१. इम्रान सुलतान शेख, २. वसिम सुलतान शेख, रा. झारेकर गल्ली, सबजेल चौक, अहिल्यानगर** यांच्या मालकी वहिवाटीचा आहे. सदर प्लॉट आमचे अशिलास कायमखुष खरेदी देण्याचे ठरविले असून आमचे अशिलाकडून विसाराची रक्कम देखील स्वीकारलेली आहे. तसेच सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी असल्या बाबत आमचे अशिलास विश्वास व भरोसा दिलेला आहे.

परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की सदर मिळकतीबाबत कोणतेही चालु वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत,गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी राईटस अन्य कस्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्त्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉट खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यात येईल.

परिशिष्ट

मिळकत वर्णन : जिल्हा अहिल्यानगर, पोट तुकडी व तालुका नगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, मौजे नालेगांव येथील खालील वर्णनाचा क्षिगतेची प्लॉट मिळकती बाबत –

ज.मं.	प्लॉट नं.	हिस्सा नं	चौ. मी.
३९/४३८/१८४+१४+४८+१६ पैकी	८	११	१८०.००

(सनकीकृत ७/१२ उतारामाणे स. नं. ३९/४३८/१३/१५/१७/४८/१८ पै/प्लॉट नं८/हिस्सा ११

वापैकी विद्यमान मालक यांचे मालकीचा दक्षिण बाजुकडील संपुर्ण प्लॉट त्याचे क्षेत्र १८.०० चौ. मी. या प्लॉट मिळकतीबाबत.

यांसी चतुःसिमा :-
पुर्वेस : ६ मीटर रोड दक्षिणेस :- प्लॉट नं. ९
पश्चिमेस :- स.नं. ३९ पैकी उत्तरेस :- प्लॉट नं, ८ पैकी पार्थसिता क्षेत्र

दि. १६/ ११/२०२६, अहमदनगर.

ॲड. नाजीम अहमद इस्माईल शेख (बीएएलएलबी)
ॲड. कुरेशी फैजान फारुक (बीएएलएलबी, डीटीएल)
पत्ता- जुने कलेक्टर ऑफिसजवळ, ढाकरे गल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६०, ७२४६२५२४८८



